Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १३ जुलई सन १८७३ इ० | अंक २८

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नवीन पुस्तक.

वऱ्हाड प्रांताची भूगोलविद्या.

हें पुस्तक मोडी लिपींत छापून खा ली सही करणाराकडेस तयार आहे किंमत दोन आणे दर प्रतीस. वीस प्रतीस चार आणे टपाल हशील पडेल ज्या कोणास हें पुस्तक घेणें असेल त्या नीं पैसा पाठऊन दिल्यास त्याजकडेस पुस्तकें त्वकर रवाना केलीं जातील. टिकिटें पाठविणें झाल्यास एक रुपया स एक आणा वर्ताळा पाठविला पाहि जे तारिख २२ माहे जून सन १८७३

विगणाजी राजाराम पाठक
डिपुटी इन्स्पेक्टर शाळाकडील
उमरावती

## विक्रीचीं पुस्तकें

खालीं लिहिलेलीं पुतकें आमचें छाप खान्यांत विक्रीस तयार आहेत. हीं पुस्त कें रोख किंमत देणारास मात्र मिळतील बाहरगांवचे नेणारास डांकहाशील शिवाय पडेल.

| पोथ्या वगैरे. | रु. आ. पै. |
|---|---|
| अध्यात्म रामायण | ४—०—० |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ०—१२—० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा | ०—२—० |
| अनुस्मृती | ०—३—० |
| भीष्मस्तवराज | ०—२—० |
| पंचरत्नी गीता सोवळ्या च बांधणीची | १—४—० |
| गायनप्रकाश | ०—४—० |
| सौभाग्यरत्न | ०—३—० |
| विवेकसिंधू | ०—८—० |
| चतुःश्लोकी भागवत | ०—४—० |
| पंचायतन नामावली | ०—३—० |
| शिवसहस्र नामावली | ०—३—० |
| चक्रव्यूह | ०—१—० |
| भूपाळ्या | ०—१—० |
| व्यंकटशस्तोत्र | ०—२—० |
| धांवे | ०—१—० |
| हरिपाठ | ०—१—० |
| अमृतरायाचे कटाव शुक रंभाचरित्र | ०—४—० |
| नळाख्यान. | ०—३—० |
| आर्या मोरोपंती द्रोणपर्व | २—०—० |
| ,, ,,मंत्र रामायण | १—८—० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला | ०—१२—० |
| सदरहू भाग दुसरा | ०—१२—० |
| विष्णुसहस्र नामावलि | ०—२—० |
| गणपतीचे श्लोक. | ०—०—० |
| भगवद्गीता | ०—६—० |
| श्रीमद्विवेक सिंधु | ०—८—० |
| रजोदर्शन शांति | ०—६—० |
| **वाचन संबंधी** | |
| बखर निळकंठ राजाची. | ०—६—० |
| लोकहितवादीकृत निबंधसंग्रह | ४—०—० |
| रुक्मिणी हरण नाटक | १—८—० |
| विक्रमोर्वशी नाटक( संस्कृत) | ०—८—० |
| हरिश्चंद्र नाटक. | १—८—० |
| वालिवध नाटक | ०—६—० |
| इंग्रजांची बखर. | ०—६—० |
| वसंतमाला. | १—४—० |
| सर्वेपरिज्ञान. | ३—०—० |
| वेताळपंचविशी मराठी | ०—८—० |
| ध्रुवाख्यान. | ०—१—० |
| गोपिचंद राजाचें नाटक हिंदुस्थानी. | ०—१२—० |
| बालज्ञान. | ०—२—० |
| इंग्लिश पहिले बुकाचे भाषांतर | ०—२—० |
| सिंव्हासनबत्तिशी हिंदुस्थानी. | ०—८—६ |
| सुहास्यवदना. | ०—१२—० |
| पहिलेंपुस्तक मराठी. | ०—२—० |
| बालव्याकरण | ०—०—६ |
| अंकलिपी | ०—०—६ |
| तोंडचे हिशेब | ०—२—० |
| **कायद्यासंबंधी** | |
| नादारीचे रुळ | ०—६—० |
| मुं. इ. मुलकी सक्युलेंर | ४—०—० |
| स्मालकाज कोर्टाचा कायदा सन १८६५ चा आक्ट ११ | —४=— |
| सन १८६५ चा आक्ट १ धारा बसविण्याचा | ४ |

## छापखान्याकडील नोकर पाहिजेत.

१. आमचे कारखान्यांत टाइपाचे छापखान्याकरितां एक प्रिंटर म्हणजे हुशार छापणारा पाहिजे. त्यानें कित्येक वर्षें चांगल्या कारखान्यांत काम केलेले असावें, त्याला लहान मोठे प्रेस उलगडतां व जोडतां येत असावेत, व कागद सुवाच्य छापतां येत असावेत व इतर तत्संबंधीं सर्व माहिती असावी पगार १५ पासून. २५ रुपये पर्यंत लायकी पाहून देऊं.

२. शिळापेसाकरितां एक लेखक पाहिजे. त्याचें अक्षर बाळबोध व मोडी सुंदर, शुद्ध व घटीव असावें. त्या नें कोणत्या एका छापखान्यांत दोन वर्षें तरीं काम केलेलें असावें. व त्यास शिळापेसासंबंधीं सर्व माहिति असावी. पगार १५ रुपये पर्यंत देऊं.

३. शिळापेसाकडील कागद छापणारा पेसम्यान पाहिजे. चांगला कारागीर असेल तर पगार १५ रुपये देऊं.

४. टाइपाच्या व शिळांच्या अशा दोन्ही पेसांचा माहितगार छापणारा एकच मनुष्य मिळेल तर त्याला आधीं ठेऊं व पगार २५ पासून ३० रुपये पर्यंत देऊं.

५. तसेंच लेखक ठेवावयाचा तो मराठी टाइप जुळणारा कंपाझिटर असून लेखक असेल तर त्याला ठेवू व २० रुपयेपर्यंत पगार देऊं.

———

ज्या कोणाची यावयाची खुशी असेल त्यांणीं आपले सविस्तर हकीकतीचीं पत्रें पाठवावीं व उत्तरें जातील त्याप्रमाणें करावें. त्यांची इच्छा असेल तर त्यांणीं एक किंवा दोन वर्षें नोकरी सोडून जाऊं नये व आम्ही त्यास काढणार नाहीं असे परस्पर करार करूं.

अकोला ता० ६ माहे जुलाई सन १८७३ इसवी. — खंडराव बाळाजी, वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

एडिटरराव गुड्बाय, अलीकडेस बरेच दिवस आपली व माझी भेट नाहीं. पूर्वी एक वेळ आपण माझें पत्र छापिलें होतें. त्या मुळें हल्लीं पुन्हा च्यार ओळी पाठवित्या आहेत तर त्यास येत्या अंकांत जागा देऊन बंदोबस्त करावा अशी आशा बाळगित आहे.

महाराज मी या वऱ्हाड प्रांती फिरत असतां जळगाव येथें आलों. तेथील चमत्कार पाहून इंग्लिश सरकारचे राज्यांतही इतका अंधेर आहे याजबद्दल आश्चर्य वाटलें व वाचकांसही वाटेल यांत संशय नाहीं. महाराज, मी सहजी कांहीं कारणानें येथील कचेरींत गेलों तों वाटेंत सरकारी शाळा (स्कूल) आहे तींत जाऊन बसलों तों मनास आनंद झाला. एकंदरींत शाळेची स्थिति बरी आहे परंतु महाराज, या शाळेस दहा हजार रुपये खर्च लागला व अजूनपावेतों तयार होऊन ४ वर्षेंही झालीं नाहींत तोंच सर्व शाळा नरसातीचा एक थेंबही बाहेर न टाकितां सर्वच आंत घेते. असो.

पुढें कचेरींत गेलों तो तेथेंही हीच रड. असा अंधेर खरोखर मोगलाईंतही नसेल. येथें दिवाणी व मुलकी काम पाहणारा एकच कारकून आहे. तहशिलदार यांस ५० रुपये पर्यंत दिवाणी मोकदमे चालविण्याचा अधिकार आहे. तेव्हां गरीब गुरीब लोकांच्या फिर्यादी येतात. परंतु रावबहादूर, लिहिण्यास दुःख वाटतें कीं, त्या फिर्यादी तीन तीन महिने तर रुजून होत नाहींत. त्यांत कित्येकांच्या तर महाळही होऊन जातात व गरीब लोकांचें नुकसानही होतें गरीब लोक दर रोज कचेरींत खेपा घालून घालून थकून शेवटीं नांव सोडून स्वस्थ बसतात. न झालेला खर्च व रोखा याबर पाणी सोडून देतात. काय करितील बिचारे! आधीच गरीब त्यांतून कसेंहीकरून कोणाकडून कांहीं रुपये काढून फिर्याद देतात व तिचा असेप्रकारें नक्शा झाला. म्हणजे त्या लोकांस किती दुःख होत असेल? तें माझ्यानें लिहिवत नाहीं. आतां या कामांत मुख्य सुस्ती काम करणारे कारकुनांची आहे असे मला वाटतें. कारण कीं फिर्यादी तपासून फैसलावर न घेतां व्यर्थ बांधून ठेवितात व वेळेवर तहशिलदार यांणीं "कांहीं मुकदमे आहेत काय? म्हणून विचारलें असतां" कांहीं नाहीं." या प्रमाणें सांगतात. हें किती आश्चर्य आहे बरें! याजबद्दल तहशिलदार साहेब अवश्य तजवीज करतील अशी आशा आहे. या दिवाणी कामाकरितां एक मनुष्य पृथक् नेमिल्यास काम सुरळीतपणानें चालेल यांत संशय नाहीं. निदान हें काम दुसऱ्याकडेस तरी सोंपून द्यावें म्हणजे बरें पडेल. व हल्लीं जें नुकसान होत आहे तें तरी कमी होईल. पत्रविस्तार भयास्तव एडिटर साहेब माफी असावी. कारण मजला आणखी तिसरे वेळीं आपली भेट घ्यावी लागेल. हाच गुड बाय. तारिख ७ माहे जुलई सन १८७३ इसवी. मुक्काम जळगांव.

आपला वेताळ सेक्रेटरी
पिशाच्च.

## नागपुरास नेटिवानें काढलेला नवीन माग.

( इंदुप्रकाशातून )

वि. वि. महंमद हुसेन दप्तरी या नावाच्या मनुष्यानें कापड विणण्याचा एक नवीन माग तयार केला आहे. हल्लीं नेटिव मागांवर कोष्टी कापड तयार करितात तें विलायती कापडापेक्षां फार महाग पडतें त्यामुळें देशी कपडा कोणी घेत नाहीं. याकरितां थोड्या श्रमानें व थोड्या वेळांत कापड तयार करण्याची युक्ति निघाली असतां देशी कापडाचा खप होऊन कोष्टी व महार लोकांचा रोजगार चालेल. असें मनांत आणून त्यानें हें यंत्र तयार केलें आहे. हें गांवठी मागापेक्षां फार उत्तम आहे. या यंत्रास एक चक्र बसविलें आहे, तें फिरविलें असतां कापड वि

णून तयार होतें. पहिल्याने मागावर पांजण करून सूत मात्र लावावें. मग चक्र फिरविलें ह्मणजे कपडा आपोआप विणून तयार होतो. एका चक्रानें तीन माग एकदम चालवितां येतील. तीन मागांवर देखरेख करणारा एक कोष्टी मात्र पाहिजे चक्र फिरविण्यास पुरुष किंवा बायकोमनुष्य व तेंही अंध किंवा पायानें पंगू असले तरी तें तीन माग चालवील. सूत वर लाकीं होणे, येटे फिरणें, फणीनें ठासणें विणलेलें कापड रोळास गुंडाळणें वगैरे सर्व कामें एकच चक्र फिरविल्यानें होतात एका मागावर एका मिनिटांत सरासरी दोन इंच कापड विणलें जातें. या मानानें पाहिलें असतां एक मजूर व एक कोष्टी तीन मागाचें काम चालवून दिवसांतून आठ तास काम केल्यांस पुष्कळ [ १२९ —१५० ] हात कापड विणून तयार होईल. हल्लींच्या मागांवर एक कोष्टी एका दिवसांत सुमार तीन हात कापड विणतो. यापेक्षां जास्ती विणू शकत नाहीं. हा माग बहुतेक करून लांकडाचा तयार करितां येतो. चक्र व त्याचा आंस मात्र लोखंडी आहे. हा तयार करण्यास फार खर्च लागत नाहीं. चाळीस पन्नास रुपयांत तयार होईल. गावठी सुतार व लोहार हे हा तयार करतील. यांत विलायती सामानापैकीं एका खिळ्याची सुद्धां जरूर लागत नाहीं. ह्या लोकांचीं मनें कलाकौशल्याकडे लागलीं आहेत. त्यांनीं हा माग पाहून तो चालू करण्याची तजवीज केली असतां पुष्कळ फायदा होईल. हा माग तयार करणारा हुसेन नामरी सूत काढण्याकरितां एक यंत्र तयार करित आहे. हें यंत्र हल्लींच्या चालू राहाटाप्रमाणेंच आहे. परंतु त्यांत विशेष फायदा एका राहाटावर एक मनुष्य साहा सात धागे एकदम काढतो. हा सूत काढण्याचा रहाट व माग एकच मनुष्य चालवील. विलायतेहून मोठमोठालीं यंत्रें आपल्या देशांत आणून कारखाने घालणें तूर्त फार कठीण आहे याकरितां हा माग व सूत काढण्याचा राहाट तूर्त उपयोगांत आणावा. या माग विषयीं व राहाटाविषयीं विशेष माहिती पाहिजे असेल त्यांनीं सदाशिव रंगनाथ तहशिलदार भंडारा हल्लीं मुकाम नागपूर यांस भेटून किंवा लिहून विचारावी. नागपूर येथील लोकांस लायब्ररींत जमा करून त्या सर्वांच्या देखत महंमद हुसेन यांनें या यंत्रावर कपडा विणून दाखविला.—नागपूर ता. २१ माहे जून सन १८७३.

आपला मित्र क्ष.

## नोटिसा.

नोटिस—बेशागी अमृतराव खुशालराव देशमुख देशपांडे तरफ खिरसो ऊर्फ मुर्तिजपुर तालुके मजकूर जिल्हे उमरावती यांजला खालीं सही करणार मी अशी नोटिस देतो कीं तुजकडेस आमचें येणें आहे त्याचा तपशील खालीं लिहिल्याप्रमाणें—

१२२९१॥ आमचे बंधू मयत कृष्णराव गोविंद याहाचे देवघेवीचा हिशोब सन १८६६ इसवीसालीं होऊन बाकी निघाली ती ऐन रकम.

१४७०॥—॥ खुद माझे देवघेवीबद्दल येणें ऐन रकम.

१३७६३।—॥ एकून तेरा हजार सातशें त्रेसष्ट साडेपांच आणे हें रुपये व बारा हजार दोनशें ब्याण्णव बारा आण्यांस व्याज सन १८६६ पासून व चवदाशें सत्तर साडेनऊ आण्याचे व्याज दिपवाळीपासून इतकें तुह्माकडेस आमचे येणें आहे. याची फेड करून देण्याविषयीं आम्ही तुह्मास एकदोन वेळ सांगून पाठविलें असतां तुह्मी लोकांचे नादीं लागून उपकार व इमान यांजवर दृष्ट न देतां अद्यापपर्यंत आमचे पैशाचा उलगडा केला नाहीं. तर या नोटिशीनें तुह्मास असें कळवितों कीं, आजपासून एक महिन्याचे आंत व्याजासुध्धा सर्व रकमेचा उलगडा करून द्यावा न केल्यास शिरस्तेप्रमाणें तजवीज करून कोर्टखर्च व नोटिसीचे खर्चासुध्धां सर्व रकम भरून घेतली जाईल कळावें. तारिख ११ माहे जुलाय सन १८७३ इसवी.

[सही] वामनराव गोविंद दस्तुर खुद्द मुक्काम मुर्तिजापुर.

### पत्रें पाठविणारांस सूचना.

"दुष्ट निर्दाळण हितेच्छु" अकोलेकर शामभट" तुम्ही अकोले नार्मलस्कुलांतील विद्यार्थ्यांच्या वर्तणुकी विषयीं जें लिहितां तें जर खरें असेल तर हो मोठीच दुःखाची गोष्ट समजली पाहिजे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे ही मुलें पुढें मास्तर होणार तेव्हां ही निदान नीतिमान व निर्व्यसनी तरी असली पाहिजेत. तथापि आम्हांस पत्र न पाठवितां सदरस्कूलचे प्रिन्सिपाल यांस जर पत्र पाठविलें असते तर खासा उपयोग साला असता व होईल.

बाशमाहून एकपत्र आलें आहे त्यावर खात्री लायक सही नाहीं व त्यांतील मजकूर ही छापण्या सारिखा नाहीं.

## वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ वद्य ४ शके १७९५

## वऱ्हाडांतील विद्याखातें व त्यासंबंधी महत्याच्या सूचना.

(लिहून आलेला मजकूर)

आपल्या ह्या वऱ्हाडांत शाळाखातें स्थापन होऊन सरासरीं १२ वर्षें होत आलीं. प्रथमतः शाळांची संख्या फारच थोडी असल्यामुळें त्याजवरची देखरेखही तहशिलदार वगैरे सिविलखात्याच्या लोकांकडेसच असे पुढें सन १८६६ सालीं स्वतंत्र डायरेक्टर नेमण्याचा ठराव होऊन मे. डाक्टर सिक्लिअर साहेब एल. एल. डी. याची त्या कामावर नेमणूक झाली. ह्या शाळाखात्याचे खरे संस्थापक म्हटले म्हणजे हेच डायरेक्टर होत. खरोखरच डाक्टर सिक्लिअर साहेब ह्यांणीं अंतःकरणापासून जिवापाड मेहनत करून एखादी पडित नापीक जमीन अनेक प्रकारचे मसाले घालून व नाना प्रकारच्या युक्ती करून फलद्रुपतेस आणावी त्याप्रमाणें वऱ्हाडांतील विद्याखातें नानारूपास आणून अज्ञानरूपी अंधःकाराचा बराच नाश केला. परंतु दुर्दैवें करून शरीरास्वस्थतेमुळें त्यांस वऱ्हाड सोडून स्वदेशीं आरोग्य पित्यर्थ जावें लागलें. आतां एवढी आनंदाची गोष्ट समजली पाहिजे कीं या साहेबांस दिवसानुदिवस आरोग्य प्राप्त होत आहे व कदाचित् दिनवर अखेर यांचा परत येण्याचा हि संभव आहे. परंतु ज्या अर्थीं त्यांस आतां वार्धक्य आलें आहे त्या अर्थीं ह्या देशांत येऊन आतां कामाचे श्रम त्यचांना च्यानें होतील असें वाटत नाहीं. अस्तु. आतां मे. क्यांडी साहेब प्रस्तुतचे अक्टिंग डायरेक्टर याचे कायमचे गाहणें झालें असतां तें ही आमच्या मतें विशेष उपयुक्त होईल. क्यांडी साहेबांच्या येण्यापासून आमच्या वऱ्हाडांतील विद्याखात्यांत पुष्कळ उत्तम प्रकारची सुधारणा झाली. किंबहुना डाक्टर सिक्लेअर साहेबांच्या हातून सुधारणा होणाच्या राहिले ज्या ज्या गोष्टी त्यांची ह्यानीं सुधारणा केली. आणि पूर्वींच्या व्यवस्थेत जें कांहीं बदलण्यासारिखें होतें ते बदलून चांगली व्यवस्था केली. मुख्यत्वें करून अभ्यासांच्या यत्तांचा जो पूर्वी घोटाळा होता तो अगदीं मोडून टाकिला. कांपिटिटीव परिक्षेचा तमाशा बंद केला. नार्मलस्कुलाची चांगली व्यवस्था केली. धीटपणास उत्तेजन दिलें. मास्तर लोकांच्या परीक्षा घेण्याचें सर्क्युलर करून निदान इतकें तरी केलें कीं त्या लोकानां स्वतांची कळकळ लागून तेच आपण होऊन आपला अभ्यास वाढवूं लागले आहेत. आतां ज्या अर्थीं क्यांडी साहेबांचें सुधारणेच्या कामीं पूर्ण लक्ष्य आहे त्या अर्थीं ह्या परिक्षेचा अमलही झाल्या वाचून राहणार नाहीं. व्यायामोत्तेजक नाना प्रकारचे खेळ सुरू केले व अशाच प्रकारच्या कित्येक उपयुक्त गोष्टी केल्या. आतां त्या सर्व गोष्टींवरून सिंक्लअर साहेब न येतील तर त्यांच्या जागीं क्यांडी साहेबांस कायम करावें असें सर्व विद्याभिलाषी मनोभावानें व खऱ्या उद्गारानें सांगतील ह्यांत संशय नाहीं. आतां ह्या खात्याच्या संबंधानें आह्मास मि० क्यांडी साहेबांस ज्या सूचना करावयाच्या आहेत त्या पैकीं कांहीं आह्मी आज लिहितों. हायस्कुलावर नॉटिव हेडमास्तरांची आवश्यकता ह्या सदरा खालीं आमचे पत्रांत जो मजकूर लिहिला होता त्याचा विचार करून तें खरें आहे किंवा नाहीं हें पहावें. उमरावती हायस्कुलांतील अव्यवस्थेचा जो आज दोन तीन महिन्यापासून डंका माजला आहे याचा शेवटचा निकाल रास्त व लोकप्रिय असा व्हावा. वऱ्हाडांत वक्तृत्वोत्तेजन देण्यास कांहींच सोय नाहीं. पुणें, मुंबई, वगैरे ठिकाणी ह्याच्या सभा असून प्रतिवर्षास उत्तम वक्त्यास उत्तेजनार्थ बक्षिसें मिळतात. तसें कांहीं तरी वऱ्हाडांत असणें अवश्य आहे. अकोला हायस्कुलांतील मुलांनीं चांगले नाटक केलें व त्यांस मे. क्यांडी साहेबानीं चांगला आश्रय उत्तेजन दिलें, ही एक वऱ्हाडांतील सुधारणेची मुख्य गोष्ट समजली पाहिजे. आतां ज्या अर्थीं हायस्कुलांतील मुलें कासगीर नाटकांत चांगलें भाषण करितात असें आहे तर अशी एखादी उत्तेजक सभा स्थापन करून त्यांस वगैरे देण्याचा ठराव केल्यास मुलें उत्तेजन येऊन ते नाटकासारखा बादक कृत्यास कारण न होतां वक्तेही होतील. आतां एक गोष्ट ही कीं—वऱ्हाडांत विद्येस उत्तेजन नाहीं याचे कारण इतकेंच आहे कीं, इकडे कांहींच मान्यता राहत नाहीं. ज होत नाहीं. उदाहरणार्थ एक गरीब विद्यार्थ्यानें श्रम करून विद्या संपादन केली आणि साधारण २०—२५ रुपये पगाराची नोकरी मिळण्यापुरतें संपादन केलें तर तशा प्रकारची नोकरी न मिळता एखाद्या दुसऱ्या शिफारशीच्या मनुष्यास मिळतेंह आश्चर्य नव्हे. सारांश वऱ्हाडांत सार्वकाल असें आहे कीं शिफारस प्रथम व मग विद्या असें जर आहे तर विद्येस उत्तेजन कोणता मार्ग राहिला? अस्तु आज इतकाच विस्तार झाला सबब आम्ही थांबतों. व पुढें सवडीनुसार आणखी सूचना करूं.

## वऱ्हाड

या आठवड्यांत ह्मणण्यासारखा पाऊस पडला नाहीं. आकाश भरून ढगानीं व्याप्त असतें. ह्मणण्या सारखा अजून थंडावा आला नाहीं हेंग्युने पुष्कळ लोक आजारी आहेत.

—ooo—

गेल्या शनिवारीं बराकींत यांचा दुसरा तमाशा झाला. ह्या वेळीं त्यांणीं कांहीं चमत्कार दाखविले परंतु प्रतिष्ठेप्रमाणें व तिकिटांचे दरानें त्यांत विशेष करामतीचे कांहीं नव्हतें.

—oo—

हायस्कुलाकडेस कसरतीचे सामान उत्तम प्रतीचें मुंबईहून आणविलें आहे व ह्याकरितां बराकीजवळ जागाही तयार होत आहे.

—ooo—

मिडलक्लास स्कुलांतील इंग्रजी शिकविणाऱ्या मास्तरलोकांची परिक्षा घेण्याविषयीं पुन्हां दुसरें सर्क्युलर झालें असें समजतें,

—ooo—

अकोटचे तहशिलदार मि. एकनाथ मोरेश्वर यांची मेहेकरास बदली झाली. व खामगावचे तहशिलदार सखाराम दत्तात्रय यांस अकोटास व मेहकरचे मि० दोराबजी यांस खामगावास नेमिलें.

मि० एकनाथराव अकोटाहून मेहेकरास त्यांच्या मनांतील कित्येक हेतु राहतील व तेणेंकरून त्याना बुलढाणा जिल्ह्यांत चैन पडणार नाहीं असें लोक ह्मणतात. कसेंही असो बदली होऊन फार दूर गेल्यास त्यांच्या विषयीं आमचें जे कांहीं मत आहे तें आम्ही सवडीनें प्रदर्शित करूं.

—ooo—

मे० नौलिस साहेब यांचे कोर्टांतील कारकून रा. नानाराव यशवंत भानपचे जागेवर अद्यापि कोणी कायम झाला नाहीं. आमचे ऐकण्यांत असें आहे कीं नौलिस साहेब यांचा हेतु ती जागा रावाचे बंधूस द्यावी असा आहे. व माधवरावजीस जागा कबूल करितां ह्मणून विचारलें आहे. इतर पुष्कळ

लोकांच्या या जागेवर उड्या वाढत परंतु आम्ही म्हणतो कीं, ही जागा पाधरनाव जीन देणें योग्य आहे व तेही कबूल करतील असें आम्हास वाटतें.

—०००—

अकोट तहशिलीतील कारकून रा. कृष्णराव यांची बदली नाळापुरास जाली व त्याचे जागीं नाळापुराहून दामोदरपंत कारकून हे जाणार कृष्णराव यानां बाळापुरास जाण्याचा हुकूम गेल्यावर दामोदरपंतास वरिष्ठानी रजा दिली होती व कृष्णराव यांणीं आपले सामान नाळापुरास रवाना करुन स्वत: मुलामाणसां सह एथें आल्यावर त्यानां परत अकोटास जाण्याचें सांगितलें होते परंतु येणेकरुन कृष्णरावाचें नुकसान होणार यास्तव आमचे दिपुटि कमिशनर मेहेरबान बुलक साहेब यानीं शेवटीं दामोदर पंताची रजा नामंजूर करुन कृष्णरावास नाळापुरास जाण्याचें सांगीतलें त्याप्रमाणें ते गेले.

—०००—

येथील वकील रा. रा. अमृतराव आबाजी यांचेवर उमरावतीकर मारवाड्यानें हुकुमनामा मिळवून त्यांत वकीलमजकूरांचें घर जप्त करुन विकलें होते. घर सरासरी ५००० रुपये किमतीचे असतां वादी याणें लिलावांत फक्त १००० रुपयांस विकत घेतलें व ती विकरी कोर्टानें मंजूर केली होती. परंतु आम्हास लिहिण्यास संतोष वाटतो कीं वकीलमजकूरानीं मेहरबान कमिशनर साहेब बहादूर यांजकडेस अपिल केलें होतें त्यांत कमिशनर साहेबांस गैरशिस्त प्रकार झाल्याचें वाटून झालेली विकरी त्यांणीं रद्द केली.

—०००—

नांदुरा —एथें गेल्या वीस दिवसांत पाऊस पडला नवता व उष्णता फार भासूं लागली होती पण दोन तीन दिवसां पासून पर्जन्य वृष्टी बरीच होऊं लागली आहे. अजून थंडावा आला नाहीं. येथून इलीचपुराकडील कोणी अटललुच्यानीं एक उत्तम बैलाची जोडी गाडी सह राजरोस आपण वर बसून चोरुन नेली त्याचा पत्ता वीस दिवसांनीं लागला व ते चोर बुलढाण्यास चौकशी करितां पाठविले आहेत नंबर १ चा चोर म्हणतो कीं, मी आठवेळा तुरंगातुन चैन भोगून आलो आहें. सदरहू चोरानें इलीचपुराकडे एक घोडी चोरली ती नांदुऱ्या जवळ वडनेर भोलजी म्हणून गांव आहे तेथें विकली व येथें गाडी बैल चोरुन इलीचपुराकडे परत विकण्यास स्वारी गेली पण विकण्याचे पुर्वींच रा. सां पडले. एथें म्युनिसिपाल कमिटी आहे त्यातील बहुतेक मेंबरानीं राजिनामे दिले. आतां कमिटींत सिलक मेंबर सगळा एक आहे. पिंपळगाव राजा एथील पोलीस स्टेशन उठऊन बोराखडीस नेलें व पिंपळगावीं आउट पोस्ट ठेऊन ते नाद्रेचिकाचे ताब्यात दिलें. आतां पिंपळगाव व गोन्दापुर वगैरे गांवचे मास्तरास कदाचीत् पगार घेण्यास एथें यावें लागेल असें होईल तर जुलूम आहे. पिंपळगावीं पूर्वींचे हेडमास्तर रा. पांडूरंग बाळकृष्ण ज्यांस एकवर्ष गृहदशा आली होती ते पुना आपले जाग्यावर नेमलेगेल पण आन एकवर्ष रा. वामनबापूजी म्हणून होते त्याचे गृह पालटल्याचे समजतें ज्योतिष शास्त्र खोटें मानावें तर प्रत्ययास येतें. तारिख २ चे सुमारास निमगाव म्हणून एथून दिडकोसांवर गांव आहे तेथें विजपडून बाहेर रानांत एक मेघ उतरले होते त्यांतुन तिन प्राणी बळी पडले मलकापुराजवळ व वघोडी म्हणून गांव आहे तेथें एक मारवाडी सुमार पंचविस वर्षाचे उमरिचा गांवा पासून दुर एका शेतात विहीरींत मेलेला सांपडला कसा मेला ते कांहीं समजत नाहीं. एथील प्रसिद्ध साहू अमिदराम मारवाडी यांचेच गुमास्त्याचा कनिष्ट बंधू गोगुळदास यानें एके दिवशीं २३ तोळे सोनें चोरुन आपल्या आंगवस्त्रासह पळून जात असतां मलकापुरास एथील चिफानें मुद्देमालासह पकडला त्यावरुन परंतु इशर्यां डाज गोकुळदास यांस आकोल्यास विनभाड्याचे घरांत सहा महिने सुखवस्तु राहण्याची परवानगी सरकारांतुन मिळाली

## वर्तमानसार

बर्लिन येथून असें कळतें कीं जर्मनीचे बादशाहा मदारी मात्रारी आहेत.

हिंदुस्थानच्या फिनान्स कमिटीनें गेल्या आठवड्यांत लार्ड लारेन्स ह्याची परीक्षा घेतली व मुंबईचे नवरोजी फर्दुनजी ह्याचीही परीक्षा घेतली.

हिंदुस्थान सरकारचे वाशिंग्टनवरुन समजतें कीं बथा. सी. ए बेली व एसी टालबट ह्यांची पोलीटिकल खात्याची परीक्षा चांगली उतरली.

विलायतेंतें पार्लमेंट सभेत हिंदुस्थानातील राजे रजवाड्यांस अपील करण्या करितां एक निराळें कोर्ट असावें अशा बाबदींत वाटाघाट चालू आहे.

यंदा सिमला एथें कायदे कौन्सिल भरण्याचा विशेष संभव दिसत नाहीं.

कोल्हापूर. गेल्याआठवड्यांत पर्जन्यराजानें तर मोठीच बहार करुन दिली. एक दोन दिवस तर सूर्य दर्शन अगदींच झालें नाहीं. ज्ञा. सा.

तुर्कस्थानाच्या सुलतानानें मिसरदेशाचा खेदिव (सुभेदार) यास आपल्या संस्थानांत पाहिजेतसा कारभार करण्याची व परराज्यांशीं व्यापारसंबंधीं करार करण्याची स्वतंत्रता दिली आहे.

जर्मनी व इराण यांचा नवा करार झाला त्यांत जर्मन सरकारानें कबूल केलें आहे कीं, इराणचा व दुसऱ्या सरकारचा वाद पडल्यांत आम्हीं मध्यस्थी करीत जाऊं.

हिंदुस्थानांत जंगली पशूंकडून मनुष्याच्या जिवाचा फार संहार होतो त्याचा बंदोबस्त करण्या विषयीं हिंदुस्थान सरकारास सांगावें असें ड्यूक आफ आर्गैल पार्लमेंट सभेंत बोलले. ज्ञा. द.

गेल्या आठवड्यांत मंगळवार, बुधवार यादिवशीं आकाश मेघमंडळानीं आच्छादित असून गुरुवार पासून पर्जन्याची सुरुवात झाली आहे; परंतु पर्जन्य पडावा तसा अजून पडला नाहीं. वारा अतिशय वाहात असतो. रोगराई विशेष नाहीं. ज्ञा. नो

मागील अंकांत पर्जन्याचे हाकाहाकी विषयीं मजकूर लिहिला होता परंतु या आठवड्यांत मेघराजानें सर्वांस आनंदी आनंद करुन सोडलें आहे. गुरुवारीं व शुक्रवारीं फार उत्तम वृष्टी झाली. बे. स.

गुजराथमित्रावरुन कळतें कीं, दमण येथें कित्येक ठकलोकांनीं एक पेढी काढिली आणि तींत असा धंदा चालविला कीं, पाहिजे त्याणें आज एक रुपया पेढीवर ठेवून उद्यां त्याबद्दल दोन रुपये घेऊन जावें. याप्रमाणें दमण येथील पोर्चुगीज गवरनर यांणीं एके दिवशीं रु० ३१० ठेवून दुसरे दिशीं ७०० रु० नेले असें कांहीं दिवस चालल्यावर कोणी असें जाहिर केलें कीं, एके दिवशीं ठेविलेल्या पैशाची दुप्पट दुसरे दिवशीं देण्याबद्दल आठवे दिवशीं दिली जाईल. तथापि लोकांचा भरंवसा न उडाल्यामुळें बऱ्याच लोकांनीं त्याकडेस रुपये भरले. तेव्हां त्यांच्यांतूनच कित्येकजण जमलेला पैसा घेऊन पळून जाऊं लागले. ते इंग्रजी अमलांत पारडी येथील पोलिसास सांपडले इकडे दमण एथील लोकांस हें वर्तमान समजतांच ते गवरनर साहेबांचे दाराशीं जाऊन धरणें धरुन बसले. तेव्हां तो बिचारा साहेब खिडक्या व दारें लाऊन आंत बसला. ज्ञा. च.

आम्हास असें समजलें आहे कीं, श्रीक्षेत्र पंढरपूर येथें सालाबादप्रमाणें यात्रा भरली होती. एकंदर यात्रा १२९००० सव्वालक्ष होती. यात्रेकरील कर दर माणशीं चार आणे प्रमाणेंच आहे, परंतु वर्षांस पंचमीपर्यंत असतो पण यंदा सप्तमीपर्यंत मुदत वाढविली आहे. एकंदर आकारणी १९२०० रुपये झाली. कुरडूच्या वाडीपासून पंढरपूरपर्यंत एकंदर ३२ मैल सडकेचा रस्ता तयार झाला आहे. भिमेस पूल बांधण्याकरितां विचार चालूं आहे. एकंदर पांच लक्ष रुपये लागतील असा अजमास झाला आहे.

येथें हवा चांगली आहे. कारण पाऊस पडल्यामुळें हवेंत थंडावा आला आहे देवदर्शनाचा पूर्वींचा बंदोबस्त चांगला होता असें म्हणणें प्राप्त झालें आहे. कारण एका वेळीं ५० लोक तोंडीत होते ते परत आल्यावर दुसरे जात यामुळें आडचण पडली. असो, माजी विष्णुपंत रानडे यांणीं तजवीज केली होती कीं, दोन बाजूंनें रांग धरुन दर्शन घेणारानीं एका बाजूनें यावें आणि दुसऱ्या दरवाजानें जावें असें केलें होतें यामुळें त्यां वर्षीं पुष्कळांस दर्शनाचा लाभ झाला होता. त्या वेळीं तें वाईट वाटलें, परंतु ती तजवीज बरी असें आतां लोक म्हणू लागले आहेत.

आगगाडी कोणते स्टेशनावर किती वेळ उभी राहणार ह्याची जाहिरात प्रत्येक गाडीस लावून ठेवावी असें हिंदुस्थानचे सरकारास कोणी लिहिल्यावरुन सरकारानें असा हुकूम केला आहे कीं, प्रत्येक स्टेशनावर गाडी उभी राहिली म्हणजे रेलवेचे नोकरानीं स्टेशनचें नाव व तेथें गाडी किती वेळ उभी राहणार तो वेळ ह्या दोन्ही गोष्टी लोकांस कळवाव्या, व ह्याविषयीं कोणी माहिती पुसल्यास नोकर लोकांनीं जबाब द्यावेत. ज्ञा. प्र.

अपघात—जिल्ह्यांतील सबार्डिनेट अउज्ञ मि० हानेल हे दोन नळयाची बंदूक छर्यांनी भरुन मांजर मारीत असतां चुकून पडद्याच्या आड बसलेल्या त्यांचा बायकोस बार लागून ती मरण पावली.

गिल क्राइस्ट स्कालरशीपची परीक्षा पुढच्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या सेमवारीं मुंबईस होईल, परीक्षा एल्फिन्स्टन कालेजाचे प्रिन्सिपाल घेतील पुढच्या आक्टोबरच्या १ ल्या तारखेच्या आंत. डायरेक्टर आफ पब्लिकइनस्ट्रक्शन यांच्याकडें अर्ज केले पाहिजेत. या परीक्षेस आजपर्यंत मुंबई इलाख्यांतून कोणी गेले नाहीं. पुढच्या परीक्षेस तरी कोणी जाईल कीं नाहीं. तें पहावें.

इराणीसरकारच्या आज्ञेवरुन हिंदुस्थान सरकारानें असा जाहिरनामा प्रगट केला आहे कीं खुद्द राणीसाहेबांस अगर राजकुळातील कोणास पत्र पाठविणें झाल्यास तें हिंदुस्थान सरकार मार्फत गेलें पाहिजे. असें न पाठविलें तर पत्राचा स्विकार केला जाणार नाहीं,

इराणचे बादशहा फ्रान्समध्यें जाऊन नंतर लवकरच स्वदेशीं परत येतील. शहा यांचा आदरसत्कार युरोपखंडांतील राजांनीं फार चांगला केला याचें कारण असें कीं, इराणचें राज्य आतां, रशिया व इंग्रज सरकार यांचो सरहद्द झालें आहे. याकरितां अर्थातच पहिल्यापेक्षां आतां इराणची जरुर सर्वांस जास्त लागू लागली आहे. ब्यारनरुटर यांणीं रशियाच्या सरहद्दीपासून तों थेट इराणच्या अखाता पर्यंत इराणातून आगगाडीचा रस्ता करण्याचा मक्ता शाहापासून घेतला असून रस्त्याच्या सर्वेचें काम सुरु झालें आहे. सोनें रुपें खेरीज करुन इराणांतील सर्व खनिज पदार्थांचा ७० वर्षे पर्यंत ब्यारनरुटरच्या कंपनीनें उपयोग करावा असा शाहानें करार केला आहे! इराणचे राज्य हल्लीं फ्रान्सच्या सुमारें तिप्पट करुन त्यांत तांब्याच्या खाणी विपुल आहेत. पृथ्वीवरील देशांपैकीं, इग्लंडखेरीज करुन इराणा सारख्या कोळशाच्या खाणी दुसरे कोठें नाहींत. रेलवे करितां बादशाहा इंग्लंडचें कर्ज काढणार रशियानें या देशांत पश्चिमें व उत्तर बाजूनें ग्रासलें आहेच. एकीकडून इंग्रज व दुसरीकडून रशिया इराणच्या सरहद्दीवर आहेत तेव्हां या देशाचें स्वातंत्र्य आणखी किती दिवस राहणार आहे हें पाहावें.

लंडनशहरीं ४३ नाटक गृहें आहेत.

इराणच्या बादशाहास ३६९ बायका आहेत.

कऱ्हादगीच्या हितेच्छु पत्रांत असें लिहिलें आहे कीं, बेळगावचे डे० ए० इनस्पेक्टर मि० भास्करराव लिमये यांच्या हपिसांतील कारकुनांनीं बेळगांवसमाचार वर छापलेल्या फिर्याद केल्यावरुन बेळगा

समाचाराच्या एडिटरानें, मि० भास्कर सवजनींनी सदरहू पत्र छापण्याकरितां दिलें आहे त्याजवरून सदरहू फिर्याद आजवर चालावी अशा मजकुराची मजानी गाजिस्ट्रेट साहेबांकडे दिल्याचें समजतें.

मुंबई स्मालकाज कोर्ट—सन १८७२ सालांत मुंबईच्या स्मालकाज कोर्टांत ३००२९ फिर्यादी एकंदर २९,४६०५० रुपयांच्या झाल्या. स्टांप, फी, व दंड मिळून सदरहू सालांत एकंदर उत्पन्न २,९२,६७८ रुपये झाले. व १,६६,९८४ रुपये खर्च होऊन बाकी शिल्लक ६९,६९४ रुपये राहिली. ने. ओ.

धुळें—या आठवड्यांत हवा थंड झाली आहे. मेघराजानें आपल्या रूप दृष्टीनें पाहिलें तेणेंकरून लोकांस आनंदमय पाझर वाहूं लागला आहे. शेतकरी लोक निर्वाहाच्या सोयी झपाट्यानें करूं लागले.

खानदेश—आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, मि० विष्णु हरी वैद्य मामलेदार तालुके नसिराबाद यांणीं ता० २१ रोजीं पेनशन घेण्याविषयीं डाक्टरचें सर्टिफिकट मे० कलेक्टर साहेबांकडे हजर केलें त्यावरून अ० साहेबांनीं तें मंजूर केलें.

खा. वै.

पाऊस नसल्यामुळें पिकें वाळत चाललीं होतीं परंतु परवाचे दिवसांपासून केव्हां बुरबुरीनेपर्जन्य वृष्टि होऊं लागली आहे येणेंकरून थोडीशी काळजी दूर जहाली आहे. धान्याचे दर अद्दित तसेच आहेत.

येथील जज्ज साहेब यांस मदतनीस असिस्टंट जज्ज मे० क्यांडीसाहेब यांस नेमिलें त्याप्रमाणें ते येथें येऊन आपलें काम करूं लागले. शु सू.

मुंबईंत गोणपाटाचा कारखाना निघणार आहे असें आम्ही एकतों.

प्रसिद्ध फोटोग्राफर रा. रा हरिश्चंद्र चिंतामण—हे ता. ११ मिनहूस पुन: विलायतेस जाणार असे कळतें. वर्णनीय धारिष्टाची गोष्ट आहे.

कलकत्यास हायकोर्टांत आणखी एक नेटिव जज्ज नेमणार सबब त्या कोर्टांच्या जज्जांनीं दोन वकिलांचीं नांवें सरकाराकडे लिहिलीं आहेत.

आसाममध्यें राहणारे बाबू रांधिकाराय रुकन प्रेसिडेनसी कालेजांतील बंगाली विद्यार्थी हे सिविलसर्विसच्या परिक्षेकरितां ता० १७ जून रोजीं विलायतेस गेले.

शेतीसंबंधाचें रसायन शास्त्र शिकविण्याकरितां एका प्रोफेसराची नेमणूक कलकत्ता प्रेसिडेन्सी कालेजमध्यें होणार व त्या शिक्षणाकरितां सामान. यंत्रें वगैरे विकत घेण्याकरितां ५,००० रु० खर्च ण्यास स्टेट सेक्रेटरींनीं परवानगी दिली.

अमेरिकन लोकांत देशाटनाचा झपाटा सुमारें १०,००० लोक अमेरिकेहून लिवरपुलास आले आहेत आणि यांच्या दसपट आणखी लोक येणार आहेत. हे लोक इंग्लंड, स्काटलंड, ऐर्लंड, स्विटझर्लंड, जर्मनी व इटली या देशांतून सुमारें आठ दहा आठवड्यांत फिरून परत स्वदेशीं जातात थोड्या दिवसांत अमेरिकन लोकांत सर्व पृथ्वी प्रदक्षिणेचा प्रचार पडेल असें म्हणतात.

कच्छचे महाराज यांनीं गुलामांचा व्यापार बंद करावा म्हणून झांजिबारांतील व मस्कतमधील आपल्या प्रजेस समजण्याकरितां जाहिरनामे प्रसिद्ध केले.

इं. प्र.

सोलापुर—या आठवड्यांत पर्जन्यानें चांगलीच आबादानी केली. खरीपाचें पेरणीचें काम सुरू आहे.

गेल्या शनिवारीं म्हणजे तारीख २८ जून रोजीं मोठा पाऊस पडून एथील तलावास सुमार तीन फूट पाणी आलें आहे.

रा. रा. दिनकर मल्हाळ यांणीं आपले घरीं देशी सुताचें कापड विणण्याचे माग लाऊन काम सुरू केलें आहे. याच प्रमाणें पंढरपुरास कापड निघूं लागलें आहे. क. त.

पुणें—मि. विनायकराव डाक्टर यांच्या धर्मार्थ दवाखान्यास औषधाची नेमणी नसल्यामुळें रोग्यांस औषध मिळण्याची कमताई असे. त्याबद्दल पुण्यांतील परोपकारी गृहस्थांनीं कांहीं पट्टी करून सरासरी दवाखाना चालविला होता. व त्यांचें काम नवीन पास झालेले मि० परांजपे चालवीत आहेत म्हणोन आम्ही मागें लिहून कळविलें होतें. त्या दवाखान्यावरील डाक्तरांनीं येथील म्युनिसिपल कमिटीस पैशाची मदत मागितली होती ती जनरल कमिटीनें मान्य करून एक वर्ष १००० रुपये देण्याचें कबूल केलें आहे. व तें काम बरोबर चालावें या करितां त्यांनीं हेल्थ आफिसरास त्यावर नेमिलें आहे असें समजलें आहे. ही गोष्ट ऐकून लोकांस आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

इराणचा बादशाहा हल्लीं विलायतेस गेला आहे. त्याचे जाण्यानें कारण काय हें बरोबर समजत नाहीं तो परत विलायतेहून निघण्याचे तयारींत आहे. त्याची आई मरण पावल्याचें वर्तमान त्यांस विलायतेंत कळलें तेव्हां त्यानें असा हुकुम केला आहे कीं तिचें उत्तरकार्य आपण गेल्या खेरीज करूं नये. त्याच्या मुलखांतील प्रजा ४५०००० आहे. तीस दु:खच होईल. परशियाचें राज्य रूस व ग्रीस प्रमाणें स्वतंत्र आहे. या बादशहास राणी साहेबांनीं नैटची पदवी दिली असें म्हणतात.

हिंदुस्थानांतील अद्वैत मतानें युरोप व अमेरिका येथील विद्वान् लोकांचीं मनें फार बिघडत चाललीं आहेत. तसेच युरोप व अमेरीका येथील नास्तिक मतानें हिंदुस्थानांतील विद्वान लोकांचीं मनें बिघडत आहेत असें डाक्टर डफ साहेबांनीं व्याख्यानांत भाषण केलें म्हणून इंडियन मिरर कर्ते लिहितात दुसऱ्याचें जवळ चांगलें असेल त्याचें ग्रहण करणें ह्याचें नाव सुधारणा. युरोपियन लोकांजवळ जें चांगलें आहे तें हिंदुस्थानचे लोक घेतात व हिंदुस्थानचे लोकांजवळ जें चांगलें आढळतें तें युरोपियन लोक घेतात. ह्यास वाईट कसें म्हणावें? ज्ञा. प्र.

सालाबादप्रमाणें श्री पंढरपूर येथें दोन चार दिवसांपासून यात्रेकरितां रेलवे मार्गानें लोक जात आहेत. गुदस्त सालीं या आषाढीचे यात्रेकरितां कंपनीनें स्पेशियल गाडीची तजवीज केली होती. त्याप्रमाणें या सालीं केल्या ऐकिवांत नाहीं. या यात्रेसारख्या प्रसंगीं रेलवेमार्गानें जाणाऱ्या वारकऱ्यांचे जे हाल होतात ते सांगतां पुरवायाचे नाहींत. अशा प्रसंगीं स्पेशियल गाडी असणें फार जरूर आहे. रा. रा. गणेश वासुदेव जोशी गरीब यात्रेकरू वरील जुलमी कर टाळण्याचा प्रयत्न करावा म्हणून येथून गेले बुधवारींच पंढरपुरास निघून गेले आहेत त्यांचा प्रयत्न कितपत सफळ होतो तो पाहूं.

लो. क.

गेल्या रविवारापासून ठाण्यास पाऊस फार उत्तम प्रकारचा पडत असल्यामुळें हवा बरीच गार झाली असून शेतांचे काम मोठ्या झपाट्यानें चाललें आहे.

अ. द.

निफाडचे मामलेदार सस्पेंड असल्यामुळें तोंपर्यंत दिंडोरीचे रावसाहेब विष्णु बापुजी यांस निफाडास नेमिलें.

ठाणें—आजपर्यंत येथें असलेले जाइन्ट जज्ज कोर्ट नाशकास ठेवण्याचा ठराव झाल्याप्रमाणें ते तिकडे जाऊन लवकरच सुरू होईल.

ठराव—उमेदवार लोकांची परिक्षा डाक्टरलोक नग्न करून घेत असत. हा ठराव बेअब्रूचा आहे असें सरकारास दिसल्यावरून ती नग्न करण्याची रीत बंद केली आहे.

पोस्टेज स्टांप सरकारांतून घेणारे पोस्टाकडील लोकांस व स्टांप वेन्डरांस एक आणा व इतर लोकांस अर्धा आणा या प्रमाणें आजपावेतों वर्तावळा मिळत असे तो आतां पोस्टाकडील लोकांस फक्त अर्धा आणाप्रमाणें वर्तावळा मिळेल आणि इतर लोकांस कांहींच न देण्याचा ठराव सरकारांनीं केल्याचें समजतें. न्या. सि.

## मनुष्याचीं या जगांतील कर्तव्य कर्में

(सभेत वाचलेला निबंध)

कृपाळू परमेश्वरानें ही सृष्टीची रचना अद्भुत केली आहे तिच्या स्थितीचें मनन करून पाहतां उत्तमोत्तम असे नियम आढळतात. सूर्य सकाळीं नियमानें उगवतो, तो पूर्वेस उगवतो, पश्चिमेस मावळतो चंद्र रात्रीं प्रकाशित असतो, पावसाळा च्यार महिने असतो, हिंवाळा आणि उन्हाळा ही चार चार महिनेच असतात. फुलें अमुक एका ऋतूंतच भरास एतात, धान्य अमुक एका महिन्यांत काढावयास येतें, फळें अमुक दिवसांत पिकतात असा नियम आढळतो व त्यावरून मनुष्यानें आपले कृतिविषयीं ही नियम पाळावे व ते अवश्यक आहेत असा ईश्वराचा हेतु दिसतो मनुष्यास आवश्यक ज्या कृती तींच त्यांचीं कर्तव्य कर्में होत.

मनुष्य व्यतिरिक्त सर्व सृष्टी करून ईश्वराची तृप्ति झाली नाहीं व त्याचें कर्तव्याचा ठसा जगतांत लवकर त्या वस्तूंनीं चांगला बठला नाहीं, पशुपक्षी जलचरें वगैरे सजीवांकडून बठत नाहीं म्हणून शेवटीं त्यानें मनुष्य प्राणी विचार शक्ती सहीत निर्माण केला. काय चमत्कार आहे कीं, साडेतीन हात कमकुवत मनुष्य हत्ती सारख्या प्राणियाला, व्याघ्रा सारख्या हिंसक प्राण्याला, महा भयंकर नद्यांना, पर्वतांना व अपार सागराला देखील अकलेचे बळानें मेंढरासारखे व हुकूमबंदे चाकर करून टाकितो यावरून मनुष्याची योग्यता केवढी दिसून येते ती पहावी. तेव्हां अशी उत्तम चित्त जो मनुष्य देह तो प्राप्त झाला असतां त्याचीं जी अवश्य कर्तव्य कर्में आहेत त्यांकडे मनुष्यानीं लक्ष द्यावें, व त्याप्रमाणें वर्तावें आणि आपल्या जन्माचें सार्थक करणें फार अगत्याचें आहे असें मला वाटतें.

मनुष्याचीं कर्तव्यकर्में किती प्रकारचीं आहेत या विषयीं विचार करून पाहिलें असतां खालीं लिहिलेल्या तीन प्रकारांत त्याचा समावेश होण्यासारखा आहे

१. आपले स्वतां विषयींचीं

१. लोकांविषयींचीं म्हणजे आप्त संबंधी इष्टमित्र, व इतर जन यां विषयींचीं कर्तव्य

१. ईश्वरा विषयींचीं कर्तव्य कर्में

——

३

आतां या विषयीं थोडा विचार करूं.

**स्वतां विषयीं कर्तव्य कर्में.**

बालपणीं मुलास त्याचें स्वतांचें कर्तव्य कांहीं. नाहीं तो प्रथम दोन वर्षें आईच्या कडेवर लोळत असतो व खेळांत गर्क असतो. पाचवर्षांनंतर शाळेंत घालण्याचें व पुढें तो शाळेंत जाऊं लागणें म्हणजे त्याला विचार प्राप्त होईपर्यंत याच्या निर्वाहाचें व शिकविण्याचें त्याच्या वडिलांचें कर्तव्यकर्म नंतर त्याला समजूं लागलें म्हणजे तो तद्विषयीं जबाबदार झाला. पुढें पूर्वक विद्याभ्यास करणें हें त्याचें कर्म आहे विद्याभ्यासाचे पाठीं देश काल पाहून आवश्यक ज्या विद्या त्यांचा अभ्यास करावा हें लक्षांत ठेवणें आहे. नाहीं पेक्षां ज्या विद्येची चाड ती पुष्कळ श्रम व द्रव्य खर्चून मिळविली तर फलद्रुप होत नाहीं व तेणेंकरून दोघांसून सुख व संतोष यांचा प्राप्ति जो उपयोग व्हावयाचा तो होत नाहीं.

नीतीनें वर्तन हें स्वतांचें कर्तव्यांतील एक आहे. अनीतीनें वागल्यापासून जे वाईट परिणाम होतात ते पासून स्वशरीरास व अब्रूस इजा होते पण चोऱ्या केल्या तर राजदंडास पात्र होऊं, असत्य बोललों व चहाड्या करूं लागलों तर अपरंनशास कारण, व्यभिचार करूं लागलों तर शरीर नाशास व लोकांच्या अप्रियतेस पात्र होऊं. (पुढें चालू)

हें पत्र अकोला एथें लंडरान फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.

Registered No. 4—1872

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ अकोला, रविवार ता० २० जुलई सन १८७३ इ० अंक २९

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| कुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## छापखान्याकडील नोकर पाहिजेत.

१. आमचे कारखान्यांत टाइपाचे छापखान्याकरितां एक प्रिंटर म्हणजे हुशार छापणारा पाहिजे. त्यानें कित्येक वर्षे चांगल्या कारखान्यांत काम केलेलें असावें, त्याला लहान मोठे पेस उलगडतां व [illegible] छापतां येत असावेत व इतर तत्संबंधीं सर्व माहिती असावी पगार १५ पासून २५ रुपये पर्यंत लायकी पाहून देऊं.

२. शिळापेसाकरितां एक लेखक पाहिजे. त्याचें अक्षर बाळबोध व मोडी सुंदर, शुद्ध व घटीव असावें. त्यानें कोणत्या एका छापखान्यांत दोन वर्षे तरीं काम केलेलें असावें. व त्यास शिळापेससंबंधीं सर्व माहिती असावी. पगार १५ रुपये पर्यंत देऊं.

३. शिळापेसाकडील कागद छापणारा प्रेसम्यान पाहिजे. चांगला कारागीर असेल तर पगार १५ रुपये देऊं.

४. टाइपाच्या व शिळांच्या अशा दोन्ही पेसांचा माहितगार छापणारा एकच मनुष्य मिळेल तर त्याला आधीं ठेऊं व पगार २५ पासून ३० रुपये पर्यंत देऊं.

५. तसेंच लेखक ठेवावयाचा तो मराठी टाइप जुळणारा कंपाझिटर उत्तम असून लेखक असेल तर त्याला ठेवू व २० रुपयेपर्यंत पगार देऊं.

———

ज्या कोणाची यावयाची खुषी असेल त्यांणीं आपले सविस्तर हकीकतीचीं पत्रें पाठवावीं व उत्तरें जातील त्याप्रमाणें करावें. त्यांची इच्छा असेल तर त्यांणीं एक किंवा दोन वर्षे नोकरी सोडून जाऊं नये व आम्ही त्यास काढणार नाहीं असें परस्पर करार करूं.

अकोला ता० ६ माहे जुलाई सन १८७३ इसवी.

खंडेराव बाळाजी वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## विक्रीचीं पुस्तकें

खालीं लिहिलेलीं पुस्तकें आमचें छापखान्यांत विक्रीस तयार आहेत. हीं पुस्तकें रोख किंमत देणारास मात्र मिळतील बाहरगांवचे नेणारास डांकहाशील शिवाय पडेल.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| पोथ्या वगैरे. | |
| अध्यात्म रामायण | ४—०—० |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ०—१२—० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा | ०—२—० |
| अनुस्मृती | ०—३—० |
| भीष्मस्तवराज | ०—२—० |
| पचरत्नी गीता सोवळ्याच बांधणीची | १—४—० |
| गायनप्रकाश | ०—४—० |
| सौभाग्यरत्न | ०—३—० |
| विवेकसिंधू | ०—८—० |
| चतुश्लोकी भागवत | ०—४—० |
| पंचायतन नामावली | ०—३—० |
| शिवसहस्त्र नामावली | ०—३—० |
| चक्रव्यूह | ०—१—० |
| भूपाळया | ०—१—० |
| व्यंकटेशस्तोत्र | ०—२—० |
| धांवे | ०—१—० |
| हरिपाठ | ०—१—० |
| अमृतरावाचे कटाव शुक रंभाचरित्र | ०—४—० |
| नळाख्यान. | ०—३—० |
| आर्या मोरोपंती द्रोणपर्व | २—०—० |
| ,, ,,मंत्र रामायण | १—८—० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला | ०—१२—० |
| सदरहू भाग दुसरा | ०—१२—० |
| विष्णुसहस्त्र नामावलि | ०—२—० |
| गणपतीचे श्लोक. | ०—०—० |
| भगवद्गीता | ०—६—० |
| श्रीमद्विवेक सिंधु | ०—८—० |
| रजोदर्शन शांति | ०—६—० |
| वाचन संबंधी | |
| बखर नीळकंठ राजाची. | ०—६—० |
| लोकहितवादीकृत निबंधसंग्रह | ४—०—० |
| रुक्मिण हरण नाटक | १—८—० |
| विक्रमोर्वशी नाटक( संस्कृत) | ०—८—० |
| हरिश्चंद्र नाटक. | १—८—० |
| वालिवध नाटक | ०—६—० |
| इंग्रजांची बखर. | ०—६—० |
| वसंतमाला. | १—४—० |
| सर्वेपरिज्ञान. | ३—०—० |
| वेताळपंचविशी मराठी | ०—८—० |
| ध्रुवाख्यान. | ०—१—० |
| गोपिचंद राजाचें नाटक हिंदुस्थानी. | ०—१२—० |
| बाळज्ञान. | ०—२—० |
| इंग्लिश पहिले बुकाचे भाषांतर | ०—२—० |
| सिंव्हासनबात्तिशी हिंदुस्थानी. | ०—८—६ |
| सुहास्यवदना. | ०—१२—० |
| पाहिलेंपुस्तक मराठी. | ०—२—० |
| बालव्याकरण | ०—०—६ |
| अंकलिपी | ०—०—६ |
| तोंडचे हिशेब | ०—२—० |
| कायद्यासंबंधी | |
| नादारीचे रुळ | ०—६—० |
| मुं. इ. मुलकी सक्युलें | ४—०—० |
| स्मालकाज कोर्टाचा कायदा सन १८६५ चा आक्ट ११ | —४=— |
| सन १८६५ चा आक्ट १ धारा बसविण्याचा | ४ |

## नोटिस.

नोटिस—लक्ष्मण शिवराम देशमुख राहणार कसबे आकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येतो कीं तुम्ही तारिख १५ जून सन १८७३ इसवीची नोटिस आम्हास वऱ्हाडसमाचार पत्राचे तारिख २९ जूनचे अंकांत दिली त्याचे उत्तर कीं मौजे रामटेक प्रगणे आकोट येथील शेत सर्वे नंबर ६३ येकर ४०३ आकार रुपये ७ याचे खाते नंदु वलद भिकाजी बारी नगोड राहणार आकोट याचे शेत माझे ताब्यात सन १२८२ फसली पासून सन १३०० फसली पावेतो एकोणवीसवर्षे ताब्यात असून सन १३०१ फसली साली सदरहू शेताविषयीं माझा दावा नाहीं व असे बद्दल सदरहू बारी मजकूर याणें मजला एक रुपयाचे स्टांपावर लिहिणे लिहून दिले आहे व ये एकोणवीस वर्षांचे रुपये ७५ मजपासून घेतले आहे व दस्ताएवज जर तुमची पहाण्याची मर्जी असल्यास बेढाळीतील चाकोक जमून असलेला मजपाशीं दस्ताएवज अवलोकन करावा तुम्ही घरांत पहाण्यास मागतां याजकरितां मी दाखवीत नाहीं असे असतांना तुम्ही सदरहू शेत बारी मजकूर यांजपासून विकत घेऊन खातें नावांणें करून घेतलें आहे आणि शेत त्या खात्या वरून तुम्ही आपले ताब्यांत मला मागता परंतु सदरहु शताचे खोत नावे जाल्यानें माझा असलेला दावा उडु सकत नाहीं. तुम्ही सदरहु शेताचे मुखत्यार खातें झाले वरून सन १३०१ फसली सालीं आहा. हाल्ली तुमचे ताब्यात माझे वहिवाटींतून मिळू सकत नाहीं. मर्जी असल्यास कोर्ट सरकारचे खुले आहेत तुमचे नोटिसीचा खर्च तुम्हास न मिळता मजला तुम्ही उलटे मात्र खर्चांत पाडलें करितां ही नोटिस पावल्यापासून माझा झालेला नोटिसीचा खर्च आठ दिवसांत आणून द्यावा अगर याप्रमाणें न केल्यास उलटा तुम्हावरच मी दिवाणीत दावा करीन कळावें तारिख १४ जुलई सन १८७३

(सही) मटाजी वलद बापुजी नेहरे कुणबी राहणार अकोट निशानी खुद्द हातची असे.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजू नये.

### लोककल्याणेच्छुचा मिजासीपणा.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि महाराज, लोककल्याणेच्छू पत्रकर्त्यांस पत्राची मोठी आवड दिसते नव्हे बरें? वर्गणीदारांवर पत्राची किंमत आणि डाक हासील हें तर आहेच परंतु शिवाय ते पत्र व्यवहाराची इच्छा करितात असें त्यांच्या आजच्या अंकांत लिहिण्याच्या ओधावरून दिसतें. त्यांनीं तारीख ५ जुलईच्या पत्रांत मस्ती या सदराखालीं असें लिहिलें आहे कीं, काल सायंकाळीं सुमारें ५ वाजतां कोणी एका कायद्यानें येथील म्युनिसिपालिटीच्या आफिसावर जप्ती आणून कारकुनाच्या बसण्याच्या गाद्या वगैरे सामान आणि गाड्या जप्त केल्या. ही जप्ती एकाच्या हेळसांडीनें दुसऱ्यास देऊन त्याचा त्यास आंगठा दाखविल्याप्रमाणें झाली सविस्तर मजकूर लोकांस कळावा अशी इच्छा असल्यास पुढाल पत्रा [illegible] निसिपाल कमिशनर !!!

पत्रकर्तेराव, लोककल्याणेच्छुकर्त्यांस,, आम्हास सविस्तर मजकूर कळावा अशी इच्छा आहे म्हणून तारायंत्रद्वारें कळवावें तर खर्च फार लागणार. पत्रद्वारें कळवावें तर न जाणो शनिवारपर्यंत पत्र पोंहचेल किंवा नाहीं याची भ्रांती आहे. तेव्हां कशी व्यवस्था करावी हें आपण तरी कळवा नाटपेड पत्र आलें तर लोककल्याणेच्छुक तें घेणार नाहींत. तरी पत्रकर्तेराव याबद्दलची काही तजवीज करावी हें आपल्या पत्रद्वारें कळविल्यास बरें पडेल.

पत्र योडक्यांतच पुरें करून आज्ञा घेतो कारण पुणेकरच्छु यानीं नाशिकवृत कर्त्यांस पत्र सुधारण्याची सुचना केली आणि आज हें चमत्कारिक कर्ते लिहिले! यांचे आश्चर्य वाटून पुढें काय लिहावें हें सुचत नाहीं तारिख ९ माहे जुलाई सन १८७३ इसवी मुक्काम पिंपळनेर.

आपला एक

क्ष

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस आपल्या सुंदर व अमोल्य पत्रीं जागा मिळेल अशी आशा धरून आपणांकडे पाठविल्या आहेत.

आर्या

अनलसमाहितसाधी ॥ रायाबारामहीवरा काया॥

अनलसमहितसाधी रायाबारामहिवरा काया ॥ १ ॥

या आर्याचा अन्वय व अर्थ लावून दे

कोणी पाठवितील त्यांचा मी मोठा आभारी होईन कळावें तारिख १६ माहे जुलई सन १८७३ इसवी.

एक संशयात्मक क्ष

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. माझी व आपली ओळख नवीच आहे परंतु पत्रव्यवहारानें आजपर्यंत मुळींच नाहीं. आतां माझी इतकीच विनंती आहे कीं आपण कृपा करून आपल्या सुंदर पत्रीं माझ्या प्रथम प्रयत्नास उत्तेजन दायक जागा द्याल.

आपल्या पत्राचा जन्म होऊन सुमारें बरीच वर्षें जाहलीं. तेव्हांपासून आपणास वऱ्हाडांत कसकशी सुधारणा झाली आहे व विद्यावृद्धि किती जाहली आहे यांविषयीं माहिती आहेच. वऱ्हाडांतील स्थितीमध्यें व रितीमध्यें किती अंतर पडलें आहे हेंही आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल. पूर्वीं जेव्हां ह्या वऱ्हाडांत इंग्रजाचा अंमल नव्हता तेव्हा लोकांस विद्येची कितपत गोडी होती हें आतां एखाद्या गैर समजूतदार कुणब्याचें उदाहरण घेतल्यानें दिसून येईल. परंतु आतां त्या कुणब्याच्या जुनाटपणावर जरी विद्येचा ठसा उठत नाहीं तरी त्यांचीं मुलें लोकांच्या देखोदेखीं इतकीं विद्या शिकण्याविषयीं उत्सुक जाहलीं आहेत कीं तीं सरकारी अमलदाराकडे आपला बाप शाळेंत पाठवित नाहीं ह्मणून फिर्याद करितात. असें मी मि० लीयानर साहेब वऱ्हाडचे आफिशियेटिंग डायरेक्टर याच्या रिपोर्टांत वाचलें आहे. ज्या वेळेस पुर्वीं इकडेस आमच्या दयाळू इंग्लिश सरकारांनीं शाळा घातल्या त्या वेळेस त्यांस ज्या ज्या अडचणी आल्या व त्यांच्या निवारणार्थ जे जे त्यांनीं उपाय योजले त्याचा येथें उल्लेख करण्यास स्थलावकाश फार थोडा आहे. तथापि किंत्येकांचें विवेचन केल्यावाचून मला राहवत नाहीं. ह्या शाळा स्थापन होण्यापूर्वीं येथें शाळा होत्या पण त्यांतील मास्तर सुशिक्षित नसल्याकारणानें त्यापासूनें होणारें उत्पन्न चांगलें न होतां बीजानुरूप होत होतें. ह्मणून त्यांतील मुलें त्या नवीन शाळांमध्यें येण्याकरितां सरकारानीं अशी दौंडी दिली होती कीं मुलांपासून शिक्षणाबद्दल कांहीं एक न घेतां शाळेंत घेतलें जाईल. असें करून बहुतकरून सर्व गावठी शाळा ओस करून त्यांची भरती केली. हा हुकूम ह्मणजे फार दिवस अमलांत होता असें नाहीं. जेव्हां सरकारास दिसलें कीं मुलें येत चाललीं तेव्हां कांहीं फी घेऊं लागले. वऱ्हाडांत बुकें ह्मणजे काय हे माहित नव्हतें किंत्येक लोक त्यांस "नोक" ह्मणत असत. हल्लीं हीं किंत्येक वृद्ध लोक ह्मणतांना एडिटर महाराज आपण ऐकत असाल. व तीं बुकें न शिकविण्याविषयीं, आईबापाच्या मास्तरांजवळ किती विनवण्या? ते ह्मणत असत कीं मास्तरबोवा आमच्या पोरास बोकविक सांगू नका मात्र कागद वाचणें व लिहिणें आणि हिशेब इतकें सांगा ह्मणजे पुरें. ही त्याची समजूत जराशी मोडत चालली नाहीं तर मग ह्मणू लागले कीं अंग्रजी नका सांग. ते बाटतील; व स्वधर्म परित्याग करून परलोकास मुकतील. अशा अज्ञान अंधःकारांत हे आमचें वऱ्हाड निमग्न झालें होतें यांत सूर्यरूपी महातेजस्वी अद्यतन पृथ्वीपती ह्या इंग्लिश लोकांनीं इतकें प्रकाशांत आणलें कीं सर्व लोक व भिक्षुकमंडळीही ज्यांच्या घरांत मूळपुरुषापासून वेदाध्ययन एकसारखें अखंड सिंहाप्रमाणें गर्जना करित आलें आहे तेही आपआपलीं मुलें नवीन स्थापित झालेल्या शाळेंत पाठवितात व त्यांच्याहा विद्याभ्यास करवितात.

ह्या वऱ्हाडांत दोन हायस्कुलें आहेत अकोल्यास व उमरावतीस. हीं मे० डाक्टर सिक्लेअर साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर यांनीं स्थापिली आहेत. ह्या दोन्ही हायस्कुलांत राहून परग्रामस्थ मुलांस विद्या प्राप्त व्हावी ह्मणून कांहीं सरकारातून स्कालरशिप्स मंजूर झाल्या आहेत. त्या किंत्येकांनीं कांपेटीटिव ह्मणून जी पूर्वीं परिक्षा होत असे तींत संपादन करून अभ्यास केला व तिमुळें अशा दशेस प्राप्त जाहली आहेत कीं जो ह्मणून या हायस्कुलाचा हेतु आहे तो त्यांनीं केला असें समजलें पाहिजे. ह्मणजे मुंबईस जाऊन म्याट्रिक्युलेशन परिक्षा देणें. आतां तींत पास होणें किंवा नापास होणें हें स्वाधीन नसून यदाकदाचित् नापास झालें असतां त्यांची अशी अवस्था व्हावी काय? ती अशी कीं एखादी जागा खाली जाहली ह्मणजे यांच्या अर्जांकडे लक्ष्य न देतां पूर्वींच लागलेले लोक ह्मणजे ज्यांनीं कधीं ह्या परीक्षेच्या निमित्या मुंबईचें तोंडही पाहिलें नाहीं त्यास मिळावी. व वऱ्हाडांतील अशा सुशिक्षित लोकांचा हक्क बुडवावा. हा पत्रकर्ते महाराज कोठला न्याय? कोणत्या कायद्याच्या कलमांत सांगितलें आहे? आपणास विदित असल्यास मला गरिबास कळविण्याची मेहेरबानगी तरी करा हो! हे त्या म्हणीप्रमाणें नव्हे काय? "पाके धाले पण घरवाले यानीं गाये गीत" ह्मणजे बाहेरील म्याट्रिक्युलेशन नापासास १५० रुपयावर पगार आणि वऱ्हाडांतील लोकांस २५ रुपये पगार देखील मिळण्यास पंचाईत!! बरें असो राहिलें सगळें पण अलीकडे रेसिडेंट साहेब बहादूर यानीं प्रसिद्ध केलेलें सरक्युलर कीं वऱ्हाडांतील शिकलेले लोकांस जागा आधीं द्यावी तें कोणीकडेस हो आतां गेलें? काय मनःपूतं समाचरेत् याप्रमाणें आहे. अस्तु पत्रकर्ते महाराज आतां माझी इतकीच विनंती आहे कीं कृपाकरून आपल्या पत्रद्वारें ही गोष्ट वरिष्टास कळवाल अशी उमेद ठेवून पुरें करितो. कळावें हे विनंती. मु. बाळापुर ता. १८ माहे जुलई

एक वऱ्हाडी.

## वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ वद्य ११ शाके १७९५

# विलायतेंतील फायनान्स कमिटी पुढें लार्ड लारेन्स यांची साक्ष.

आपल्या हिंदुस्थानच्या हितार्थ इंग्लंडांत पार्लमेंट सभेमध्यें कितीएक सद्गृहस्थ अंतःकरण पूर्वक झटत असतात अशाविषयीं आलीकडे पुष्कळ उदाहरणें आपल्या पहाण्यांत आलीं आहेत. त्यांतून धडधडीत आपल्या डोळ्यासमोर ह्या प्रकरणीं विचार करूं लागलों असतां येणारें उदाहरण मिस्तर फासेट साहेब यांचे यानीं जे उत्तम संभाषण कांहीं दिवसापूर्वीं केलें. त्याचा ठसा व त्यासंबधीं साहेब महसुकांचे आभार हीं भरत खंडस्थ लोकांच्या मनांत आजन्म वास्तव्य करतील ह्यांत संशय नाहीं. अस्तु. आतां आजच्या प्रसंगीं लार्ड लारेन्स साहेब ह्यांनीं फिनान्स कमिटी पुढें जी साक्ष दिली त्याचा सारांश टाईम्स पत्रांत लिहिला आहे तो आम्हीं आपले वाचकांस कळवितों. लार्ड लारेन्स साहेब हे पूर्वीं हिंदुस्थानांत गव्हरनर जनरल होते ते ह्या देशांत उत्तम प्रकारें राज्य कारभार चालवून विलायतेस आपलें नाव करून गेले व त्यांस हिंदुस्थानच्या राज्य व्यवस्थेची व दुसऱ्या किंत्येक गोष्टींचीं माहिती असल्यामुळें त्याचें ह्या देशा विषयीं जें मत पडणार आहे तें रास्त व सर्वमा[illegible] पाहिजे.

प्रथमतः लार्ड साहेबांस विचारिलें कीं जमिनीच्या साऱ्याचा दर नियमित असावा किंवा कसें? ह्यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं जमीनीचा सारा निश्चित असणें हेंच चांगलें आहे कारण सारा वारंवार वाढत गेला तर देश भरभराटीस येत नाहीं बंगाल्यात पिकाचें उत्पन्न ज्यास्त होण्याचें हेंच कारण आहे. येवढ्या करितांच लार्ड कर्नवालिस यानीं बंगाल्याचा सारा निश्चित करण्याचा ठराव केला. आतां चार्लस वुड यांच्या म्हणण्या प्रमाणें हा कर सर्व देशभर चालू केला असतां चांगला. मात्र सारानुसार कर वाढविण्याचीं अधिकार सरकाराकडेस असावा एकंदरींत लार्ड साहेबांचें मत आम्हांस योग्य दिसतें. कारण ह्या शिवाय जमीनी विषयीं लोक ज्यास्त उत्कंठा घेणार नाहींत व पाके चांगले भरभराटीस येणार नाहीं

नेहमीच्या पाती वरील कराविषयीं यांचें असें मत आहे कीं तो नेहमी कायम असावा मात्र मनुष्याच्या स्थितीनुरूप त्यांत फेरफार असावा म्हणजे ज्यास कोणताच कर नाहीं अशा लोकांवर कर बसवलाच पाहिजे कांहीं लोक एखाद्या राज्याच्या आश्रयास राहून पैसा मिळवितात. असा प्रकार चालू आहे काय म्हणून विचारलें असतां त्यांनीं सांगितलें कीं उत्तम प्रतीच्या लोकांत असा प्रकार कांहीं चालू आहे. आतां लार्ड साहेबांच्या ह्या म्हणण्यांत गैरशिस्त म्हणण्यासारखें कांहींच नाहीं. आतां तिसरा प्रश्न मिठावरील कराविषयीं होता याचें उत्तर लार्ड साहेबानीं असें दिलें

कीं सध्या मिठावर जो कर आहे तो
च ज्यास्त प्रमाणाचा आहे त्यामुळें मी
फार महाग झालें आहे. आणि ह्यामु
जनावारांसही मीठ पाहिजे तितकें मि
नासें झाल्यामुळे त्यांची शेकडों संख्या
रत आहे एवढ्याकरितां त्यांजवरील
कमी व्हावा हें साहेबबहादुराचें मत
च स्तुत्य होय. खरोखर मिठावर सर
रानें कडक कर बसविला आहे. आ
तो पदार्थ तर मनुष्याच्या आरोग्यास
रण आहे. तेव्हां लोक महर्गतें करितां
घेण्याची टाळाटाळ करितात. परंतु
योगानें देशांत मृत्यूची संख्या ज्यास्त
ढते. एवढ्याकरितां हा कर कमी कर
विषयींचे लार्ड साहेबांनीं मत दिलें ते
मच्यामतें पसंत आहे. अफूच्या बाबदीं
पूर्वींचाच क्रम चालू ठेवण्याचें त्यांनीं
गितलें. व माळव्यांतील नियम सर्व
चालू केले असतां बरें असेंही दर्शवि
अफूच्या उत्पन्नाचा बारा वर्षांपूर्वीं घोटाळ
होता परंतु आतां सर्व ठीक आहे असें
णाले. नंतर लार्डसाहेबांस सरकारी उ
न्न वाढाविण्याचे कांहीं मार्ग सांगा म्हणू
विचारिलें. त्यांनीं उत्तर दिलें कीं सांप्र
नवीन कर वाढविण्याचें कांहीं कारण न
हीं. एखाद्या संस्थानावर किंवा एखा
इस्टेटीवर नवीन मालक आला म्हणजे
त्यापासून कर घ्यावा अशाविषयीं लोकां
म्हणणें आहे तें मला प्रशस्त दिसत न
हीं. तंबाखूवरही कर असूनये का
ती देखील गरीब लोकांच्या उपयोगाची
वस्तू आहे. नंतर लार्डसाहेबांस विचारि
का हिंदुस्थान सरकारास इतर सरकार
कांहीं खात्याचा स्वतंत्र अधिकार दि
स कसे होईल. त्याजवरून त्यांनीं सांगि
लें कीं, ह्यापासून कांहीं फायदा होण
नाहीं. हाताखालच्या सरकारास स्वतं
ता दिली तर ते इच्छेस वाटेल तसे वा
व्यास किंवा खर्च वाढविण्यास मागे
ढें पाहणार नाहींत. कर पाहिजे तसे
वितील. एवढ्याकरितां तसें करणें प्रश
नाहीं! व तसेच सरचार्लस ट्रेव्हेलियन
नीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत फेर
करावा असें म्हटलें होतें त्याविषयीं
साहेबानां अभिप्राय विचारिला. ला
साहेबांचे म्हणणे कीं हिंदुस्थानातील
सरकारांस उत्पन्न खर्च ह्या बाबदींत
तंत्र अधिकार द्यावा म्हणजे त्याणीं
रुप सरकार ह्याचे खर्चीकरितां कांहीं र
म नेमून द्यावी बाकी मुख्य सरका
ह्यांच्या पैशाच्या बाबदींत निरंकुश
घालू नये. हा प्रकार लार्ड सा
नीं अगदीं अमान्य केला. ते म्हण
कीं ह्याचें हातीं स्वतंत्र अधिकार दि
असता ते खर्च कमी करितील असें
हीं तर ज्यास्त उधळेपणा करितील.
देशात दंगेधोपे झाले असता त्यांचा
दबिस्तास पैसा वेळेवर पुरविणार न
त. वगैरे अनेक अडचणी दाखवि
नंतर लार्ड साहेबास स्टेटसेक्रटरी, त्याचे
लायतेंतील कौन्सिल व हिंदुस्थान, सर
ह्यांच्या कामाकाजाविषयीं विचारिलें.
नीं एकंदरींत सांगितलें कीं हीं सर्व
ष उपयुक्त असून उत्तम प्रकारें चा
आहेत. तैथेंच रेल्वेविषयीं गोष्ट नि
ली होती त्यावर लार्ड साहेब म्हणाले
रेल्वेकरिता इतका पैसा खर्च झाला
रोबर झालें नाहीं. फौजेच्या खर्चा
रकम लार्ड साहेबानीं मान्य केली व
संबंधी सर्व व्यवस्था उत्तम प्रकारची

कदरींत पाहतां आपल्या वाचकांस अ दिसून येईल कीं लार्ड साहेबांचे प ह्मणजे फारे वर्षें हिंदुस्थानांत राहून ह्या देशांतील सर्व प्रकारच्या खुब्यापास समजल्या आहेत व जो ह्या देशाच्या स्थितीचा पूर्ण माहितगार आहे त्या पुरुषानें दिलेल्या मताप्रमाणें दिसल. व ह्यावरून हिंदुस्थानच्या कल्याणाची त्यांची इच्छा कितपत आहे हें ही स्पष्टपणे दिसून येईल. अस्तू असे पुरुष जेव्हां हिंदुस्थानचे गाबदींत कळवळा दाखवितील तेव्हां आपचे देशांतील लोकांचे भाग्य उदयास आलें असें समजलें पाहिजे. अस्तु. आज आह्मी इतकेंच पुरें करितो या साक्षी नंदल आपचें मत सविस्तर पुढें सवडीनुसार आपचे प्रिय वाचकांस कळवूं.

## वऱ्हाड

ह्या आठवड्यांत पाऊस अगदीं पडला नाहीं वारा मोठ्या झपाट्यानें वाहात असतो. पाऊस न पडल्या कारणानें पिकाचें अतिशय नुकसान होत आहे. कित्येक शेतांतून पेरलेले बी अजून बाहेर पडलें नाहीं व जेथे उगवलें आहे तेथे त्यास कीड लागली आहे. शेतकरी ह्मणतात कीं आतां जर पाऊस न पडेल तर सर्वोपरी नुकसान होणार आहे. गुडघे मोडीनें गावातून आपलें ठाणें अजून काढलें नाहीं. ज्या घरी हिचें प्रस्थान जातें तेथें एक सुध्दा मनुष्य हिच्या सपाट्यांत आल्यावांचून नहूत करून रहात नाहीं.

—०००—

मलकापूर व बाळापुराकडे गुडघे मोडीचा आजार असल्याचें समजतें.

—०००—

कालरोजीं येथे दोघा पोलिसच्या शिपायांचे भांडण लागलें व ते वाढत वाढता इतकें निकराला आलें कीं येकानें दुसऱ्यास मारल्या बरोबर त्याचा प्राण गेला मारणारास त्याच वेळेस पकडला. मेलेल्याचें प्रेत डाक्टराकडे पाठविलें

—०००—

रा० रा० परशराम सखाराम उमरावतीच्या डे० क० चेक्लार्क आफ दी कोर्ट यांस ससपेंड केले व, यांची चौकशी करण्याकरितां कमिटी नेमिली होती वगैरे पूर्वीं लिहिलेंच आहे. आतां असें समजते कीं यास बडतर्फी मिळाली. व त्याच्यावर कुलगडी आणणार श्रीधरपंत रा. यांस ही बडतर्फी मिळाली. दुसऱ्याचें चांगलें करितां असताही आपलें एकादे वेळेस नुकसान होतें मग दुसऱ्याचें वाईट करण्यास प्रवृत्त झाल्यावर आपलें चांगलें होणार नाहीं हें श्रीधरपंतास पूर्वी समजलें असतें तर बरें झालें असतें. आणखी डे० क० आफिसांतील कारकून रा० रा० गणेश जिवाजी यांस ही यांच खटल्याचे संबंधानें काढून टाकिले हें जर खरें असेल तर रेड्याचें झुंज व झाडाचें मरण ह्मणण्यास काय हरकत आहे.

—००—

रा० रा० भास्कर सखाराम उमरावती क० चे क्लार्क आफ दी कोर्ट यांणी एक वर्षाची रजा घेतली.

—०००—

उमरावती हायस्कूलचे हेड मास्तर मि० ग्याकिंटाश हे चारमहिन्याचे रजेवर जाणार व त्यांचे जागीं रा० रा० श्रीराम भिकाजी जटार बी. ए येथील डे. ए. ई. यास नेमणार असें ऐकतों. असें झालें तर उमरावती हायस्कुलचे तूर्त नशिब उघडलें असेंच समजलें पाहिजे. वऱ्हाडांतील हायस्कुलांवर नेटिव हेडमास्तर नेमतील तर ती चांगल्या दशेस येतील व सरकारचा हायस्कुलें स्थापण्यांचा हेतु सिद्धिस जाऊन पैशाचा सद्व्ययझालासें होईल.

—००००

सदरील नेमणुका झाल्यास रा. रा. श्रीराम भिकाजी यांचे जागेवर रा. रा. वामन बाळाजी डेरेक्टर आफिसांतील हेड क्लार्क यांस नेमणार.

—००—

रा० रा० चिमणाजी रामाराव उमरावतीचे डे ० ए० इ० ४ दिवसपूर्वीं येथें आले होते.

—०००—

मे० हडलस्टन साहेब बुलढाण्याचें डे० क० यांची स्वारी येथे आली आहे.

## वर्तमानसार

नवसरीस व सुरतेस पाऊस पुष्कळ पडला.

मुंबई ग्याझेटांत तीन साहेबांविषयीं कांहीं मजकूर छापला होता मग तो मजकूर खोटा आहे ह्मणून सदरहू पत्रकर्त्यांनीं माफीही मागितली होती. ते न ऐकतां त्यांपैकीं एका साहेबानीं पत्रकर्त्यांवर अब्रूच्या नुकसानीं बदल १०००० रुपयांची फिर्याद केली आहे.

काठेवाडांत एका मुलानें आपलें शिर महादेवास अर्पिलें.

शहाच्या सन्मानार्थ फ्रान्सचे लोक ३२०००० फ्रांक खर्च करणार.

अहंमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील इरिगेशन पाट व बंधारे हें खातें बंद होणार.

एका जपानी मनुष्या बरोबर एका इंग्लिश स्त्रीनें लग्न केलें.

ग्वालेरीकडे पाऊस पुष्कळ पडला.

कलकत्ता एथे कोणीं तोंड न उघडतां बोलणारा साहेब आला आहे.

हवा:— या आठवड्यात हवा थंड झाली आहे. आकाशांत अभ्रें नेहमीं इकडून तिकडे भ्रमण करितात पाऊसाची भुरभुर बहुधा असते गावोगाव पर्जन्य नेहमीं पडून पेरण्यास चांगली वाफ होऊं देत नाहीं. तापाचा आजार शहरांत सुरू आहे. तिळी कपाशी ज्वारी ह्या पिकाचे पेरचे झालेते प्रस्तुत बाजरीचे पीक पेरण्याचा हंगाम असल्यामुळें तें काम सपाट्यानें चालूं आहे.

मि० धोंडो शामराव गरूड यांची स्वारी धुळ्याहून इंदुरास ता० ७ मिनहू रोजीं गेली. त्याच बरोबर आलेले त्यांचे स्नेही मि० पांडुरंग गोपाळ डाक्टर हेही इंदुरास गेले. मि० गरूड यांणीं धुळ्याचे लायब्ररीस पन्नास पाऊणशे रु० चे किंमतीची बुकें दिलीं असें समजतें. ही गोष्ट तारीफ करण्याजोगी आहे. खा. वै.

नाशिक चमत्कारिक चोरी— येथें अकौंटंट कचेरींत ता. ३ जुलई सन मजकुर रोजीं सुमारे बारावर एक वाजतां दिवसा मनिआर्डर बुकाचे दोन फार्म चोरीस गेले. या कामांत दादाजी सखाराम देशपांडे याच हपीसांतील क्लार्क व एक शिपाई असें ससपेंड आहेत. तपास चालू आहे परिणाम काय होईल तो पाहावा. ना. वृ

मुंबई आग्रिकल्चरल सोसायटी—नें शेतकरी लोकांस उपयोगीं पडणारें असें एक लहानसें पुस्तक छापून पसिद्ध केलें आहे यांतून पुढील उतारा घेतला आहे:—

वारंवार पिकें निघाल्यानें चांगल्या जमिनी हलक्या होतात; मुळच्याच ज्या हलक्या जमिनी असतात त्यांत योग्य पीक उत्पन्न होण्याच्या अगोदर त्या सुधारण्याकरितां अनेक उपाय योजावे लागतात. कित्येक जमिनी स्वभाविकच येवढ्या उत्तम प्रतीच्या असतात कीं, वीस तीस वर्षेंपर्यंत त्यांची लागवड केली असतांही त्या सुपीकच; तथापि अशा प्रकारच्या अव्वल जमिनी देखील कांहीं वेळानें कधींनाकधीं खराब व्हावयाच्याच, म्हणून अशा सर्व बाबदींत, शेतकरी लोकांनीं खताकडे आणि त्याचप्रमाणे जेणेकरून शेतास सुपीकपणा येईल अशा अनेक उपायांकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे.

आतां खत हें काय व ते कसें असलें पाहिजे त्याविषयीं आपण विचार करणें आहे. कोणत्याही प्रकारचे साकीं, ज्या साधनेकरून, वनस्पतीची वाढ अधिक होऊन, त्यावर फळफळावळ भरपूर येते अशा सर्व प्रकारच्या साधनांस खत असे ह्मणतात. वनस्पतीच्या रचनेची तपासणी केली असतां असे आढळेल कीं ती प्राणवायु उदकजनकवायु शुद्ध कोळसा, नैत्रोजिनवायु इत्यादिकांचीं झालेली असून तींत खारट पदार्थांचा थोडासा अंश असतो. तर यावरून असे उघड होतें कीं ज्या पदार्थांचे खत असावयाचें त्यांत ह्या वर सांगितलेल्या पदार्थांचे अंश घतले पाहिजे; कारण, जर ते त्यात नसले तर वनस्पतीच्या अवयवांत न्यूनता पडेल आणि अशी न्युनता पडली ह्मणजे जे वनस्पतीमध्यें रस वगैरे पदार्थ अगत्य असलेच पाहिजेत आणि ज्यांच्या योगेकरून झाडांचीं विलक्षण व्यवस्था व पोषण होऊन तीं निरोग रहातात असे पदार्थ त्यांत उत्पन्न होणार नाहींत जे खत घालावयाचें तें हवें तेवढेंच घालावें कारण उणें झालें तर जे त्यांत वास्तवीक आवश्यकतेचे गुण असावेत ते नाहींसे होतील व जर अधिक झालें तर त्यांतून बहुतेक व्यर्थ जाऊन त्यापासून व्हावा तसा फायदा झाडास होणार नाहीं.

आबांडी. ज्या पाण्यांत वाख काढण्याकरितां अळशी आणि त्याचप्रमाणें सण काढण्याकरितां आंबाडी भिजत घालतात त्या पाण्याच्या अंगी जमिनीला सुपीकपणा आणणारा मोठा गुण असतो त्यामध्यें अस्याच्या आंतल्या पिसोव्याप्रमाणें पदार्थ असून वनस्पतीचा अंशही पुष्कळ असतो, असें दिसून येते आणि तें करतांही सहज चांगल्या प्रतींचे वाख मिळण्याकरितां, अळशी व आंबाडीचीं झाडें ज्या पाण्यात भिजत घालतात त्यांत तीं झाडें कांहींशी उमळली पाहिजेत हें अगदीं आवश्यकतेचें आहे. तर असे वाख व सण उतळले ह्मणजे त्यांस पाण्यातून काढावे व त्यांस काढले कीं लगोलग तें पाणी लताच्या कामास लागावें. पण कित्येकांस त्याचें खत होतें असें माहित नसल्यामुळें ते बहुधा मोठमोठाल्या तळ्यांत अगर कधीं कधीं वाहती नदीच्या ओहोळांत देखील भिजत घालतात ह्मणून ते पाणी शेतकीच्या कामास लावण्यासारखें होत नाहीं. कारण तळ्यांतलें पाणी पुष्कळ व नदीच्या ओहोळांचे पाणी वहातें यामुळें त्या झाडांतील वनस्पतीचा अंश जिकडे तिकडे पसरून जातो.

साध्या मिठाविषयीं. हें मीठ ज्या जमिनीस अगदीं खारटाई नसेल तींत खालीं सांगितल्या प्रमाणें उपयोगीं लावावें. लागवडीच्या जमिनी नांगरतेवेळीं, साधें मीठ चांगलें बेतवातानें घातलें ह्मणजे तें मोठ्या उपयोगाचें होतें असें आढळलें आहे. कारण त्याचें खत होतें व त्यांत स्वच्छ करणारे गुण असून तेणेंकरून सुपीकपणा अधिक होतो. झाडांस आणि विशेषें करून कणसे येणाऱ्या झाडास जो एक प्रकारचा रोग होत असतो व ज्या रोगानें सर्व कणसें गळून पडतात त्या रोगास येणेंकरून प्रतिबंध होतो दुसरें वनस्पतीस कीड लागत नाहीं इत्यादि फायदे त्याजपासून होतात आणि विशेषें करून गवती जमिनींचें उत्पन्न वाढविण्यांस हें फार उपयोगाचें आहे.

हाडां विषयीं. हाडांचा चुरा करून त्याचा खता करितां उपयोग करितात. त्याची बुकणी जेव्हडी बारीक होईल तेवढा तींत अधिक गुण येतो तेंयेवढा कीं त्या हाडांस जात्यां मध्यें दळण्याचा व बारीक बुकणी करण्याचा जो खर्च पडतो त्याजपेक्षां शेतकऱ्यास आधिक फायदा होतो कारण जेवढे त्यास बारीक करावें तेवढी तेवढी त्याची सुपीकपणा आणण्याची शक्ती वाढतें पण त्या बुकीचा खताकरिता उपयोग करण्यापूर्वीं ती बुकी जेवढी सुकी ठेववेल तेवढी सुकी ठेवावी. आणि ज्यावेळी दाणा पेरतात त्यावेळीं जर ही हाडांची बुकणी फेकली तर ती थोडी लागते. कुजलेल्या हाडांची माती व त्याचप्रमाणें हाडें साफ करते वेळी जो त्यांचा चुरा निघतो तोही वर सांगितल्याप्रमाणें उपयोगी पडतो. या सदरहु हाडांच्या खताची प्रचिती सुमोर ईसवी स० १८३८ या सालीं रत्नागिरीचे माजी कलेक्टर आलेक्झांडर येलफिन्स्टन यांहीं घतली होती त्यांणीं विलायतेहून एक चरक आणऊन व त्या जिल्ह्यांतील प्रत्येक ठिकाणची हाडें गोळा करऊन त्या चरकांत दळविलीं आणि आंबा, फणस व इतर झाडांस त्यांचे खत घालून प्रचिती पाहिल्यावर हें फार चांगलें खत होतें असें सिद्ध झालें. ने. मो.

गेल्या शनवारापासून मेघराजानें सर्वांस आनंद देण्यायोग्य पर्जन्यवृष्टी चालविली आहे येणेकरून हवा ही बरी ज्हाली असोन ताप वगैरे आजारांचाही खुप जोर ज्हाला आहे.

दहिवडीचे मुनसफ मि. डब्ल्यु स्काट हावेल साहेब यांची मडम त्यांणीं भरून ठेविलेली बंदुक गफलतीनें उडून आंतील छर मडमेस लागुन ती तत्काळ मरणपावली. ह्याजमुळें स्काट हावेल साहेब हे पुण्यास गेले होते ते परत येऊन आपलें काम पाहूं लागले. ज्ञा. सू.

सोलापूर हवा—गेले आठवड्यांत। पर्जन्य वृष्टी जास्ती नाहीं असा एकही दिवस गेला नाहीं व हल्लीं हीं त्याप्रमाणेच वृष्टी होत आहे पेरणीचीं कामें मोठ्या झपाट्यानें चालली आहेत. तूर्त होत असलेले वृष्टीमुळें आकाश मेघमंडळानें अच्छादित असतें. यामुळें हवन कांहीं चमत्कारिक प्रकारचा गारठा असून शहरांत हींवज्वराचे वगैरे अजाराचे बरेच मानव्य झालें आहे. क. त.

## खडकवासला धरण.

आह्मास लिहिण्यास आनंद वाटतो कीं, आज दोन चार वर्षें खडकवासल्या धरणाचें काम सुरू आहे. तें आतां बहुतेक संपलें ह्मटलें असतां चालेल. एकदर भिंतीची उंची व रुंदी पायापासून तों शेवटपर्यंत सुमारें २५१ फुटीची उंची सध्या तयार झाली आहे व आणखी सुमारें ८।१० फूट उंच करणार आहेत. पायाची रुंदी सुमारें ६० फूट आहे व जमिनीच्या सपाटीबरोबर सुमारें २७ फूट रुंद आहे व शेवटची रुंदी अदमासे ६,७ फूट ठेवणार ह्मणोन एकतो. पुढें त्या भिंतीवर पाणी सोडण्यास व बंद करण्यास एक यंत्र ठेवणार आहेत. आतां भिंतीच्या दोन्ही बाजूस लोखंडी कठडा करणार आहेत किंवा दगडी भिंत व दोन दोन हात उंचीची करणार हें बरोबर समजलें नाहीं. न करीत असल्यास त्यांनीं दोहोंपैकीं कांहीं तरी करावें अशी आमची त्यास सूचना आहे. भिंतीचा आकार कांहींसा प्याराबोलिक ( वर्तुळाकृति जवळ जवळ ) आहे. तिची लांबी सुमारे १, १। मैल येईल. अजून लांबीचें काम पुरें झालें नाहीं, अदमासे ३००।४०० फूट लांब वर सांगितल्या आकारानें जमिनीच्या सपाटीपासून तयार होणार आहे. हल्लीं आपल्या नदीस जें पाणी येत आहे तें सर्व सदरील बाजू कडून येत आहे. हल्लीं हें पाणी तलावा बाहेर जाऊन तलावांत एकंदर ८० फूट उंचीचें पाणी आहे. तरी भिंतीची उंची सध्या पाण्याच्या सपाटीपासून ६० फूट आहे.

कनाल ( कालवा ) मध्यें पाणी येण्याकरितां १० स्लुईससे कमानी किंवा भोंकें ठेविली आहेत. प्रत्येक कमान सुमारें ४।५ फूट उंच व ३।३॥ फूट रुंद आहे. शिवाय कोणास कापसाच्या गिरण्या चालवावयाच्या असतील अगर दुसरीं कांहीं यंत्रे चालविण्याचीं असतील त्यासही त्या हुशार व धुर्त इंजनियरानें सोय करून ठेविली आहे. ती जागा सदरील कनालमध्यें जेथून पाणी येणार त्याच्या लगत्याजवळच केली आहे. सदरील यंत्रास पाणी घण्याकरितां ८ कमानी ठेविल्या आहेत सदरील कमानी पुढें सुमारें ५ फुटावर एक १५ फुट लांबीची भिंत घालून त्या भिंतीस मोठ्या तीन कमानी राखल्या आहेत. वरील यंत्रास जितकें पाणी लागेल तितकें घेऊन बाकी राहिल तें पाणी कानालां [ कालवा ] त येण्यास मार्ग ठेविला आहे.

एकंदरीनें पाहतां ही तलावाची जागा इतक्या बेतानें साधून घेतली आहे कीं, त्या आसपासच्या सुमारें ५—६ कोसांत जितकें पाणी पावसाळ्यांत पडेल तितकें सर्व पाणी ओढ्याच्या नदीच्या व दुसऱ्या हरएक प्रकारानें ह्मणा, तें सर्व पाणी सदरील तलावांतच येणार, दुसरी कडे जाण्यास मार्ग नाहीं. कारण सभोंवती सर्व डोंगर आहेत. ज्ञा. प.

## मनुष्याची या जगांतील कर्तव्य कर्में

( मागिल अंकावरून पुढें चालू.)

संगती चांगली धरणें हें स्वसंरक्षणाच्या कर्तव्यकर्मास फार आवश्यक आहे. कारण कुसंगतीनें बहुतांचा नाश झाला आहे व सुसंगतीनें बहुतांस उत्तम मार्गीं सहाय झालें आहे. आपण स्वतां चांगले विद्वान असलो, नीतीनें वागत असलो व निष्कलंक असलो आणि संगतीनें जर वाईटाच राहिलो तर आपले सर्व सद्गुण लोपले जातात व त्या साथिदाराच्या दुर्गुणाचे आपले स्वतांवर आरोप होतात यासाठीं संगती ज्याची करावयाची त्याच्या उत्तमतेविषयीं व सद्गुणाविषयीं चांगली माहिती मिळवून व खात्री करून घेऊन नंतर त्याची संगती करावी ह्मणजे त्यापासून परिणाम शुद्ध निपजेल हें सर्वकाळ लक्ष्यांत असावें.

वेळेचा सद्व्यय हाही आपले स्वताचे कर्तव्यकर्मांतील अवश्य भाग आहे. मनुष्याचें आयुष्याचा कांहीं भरवसा नाहीं. तरुणपणीं ऐष आराम भोगु या पुढें वृध्दपकाळीं पुण्यकर्में करू असें ह्मणणारे कित्येकजण तरुणपणातच मेले आहेत, कोणास केव्हां कसा प्रतिकूळ काळ येईल याचा नेम नाहीं संपत्तीच्या भरांत व मिळकतीच्या ओघांत मनुष्याच्या दृष्टीला विकार होतो. तेव्हां त्याला कर्तव्यकर्माविषयीं कांहीं दिसत नाहीं. व कोणी बोध केल्याच तर त्याला वाटतें कीं आपले वहिवाटीची सुधारणा करण्यास अझून पुष्कळ अवधी आहे. सध्या तर चैन मारू द्या इतक्यांतच त्यावर प्रतिकूळ काळाची फेरी येते व सुधारणेचे सर्व मनोरथ जागच्या जागीं राहातात यासाठीं दररोज उद्याचा भरवसा नाहीं, असें मनांत आणून जें कर्तव्य तें करित जावे व वेळ चांगल्या आणि अवश्यक कामांत खर्चीत जावा. वेळेचा भरवसा मानुन अयोग्य कृत्यांत गुंग होण्यापेक्षा चांगली कर्मे होतील तितकी दररोज आधीं करित जावी व आळसाची वृध्धी करणारी. कंटाळवाणीं, व टाळण्यास योग्य अशीं कृत्ये सर्व काळ उद्यावर ठेवावी ह्मणजे नरावाईट प्रसंग आल्यास हळहळण्यास कारण राहणार नाहीं.

कोणत्याही दुर्व्यसनाच्या आधीन न होण्याविषयीं जपावें हेंही आपलें स्वतांचें कर्तव्यकर्म आहे. व्यसन एकदम जडत नाहीं, व तें आपण होऊन कोणाला जडत आहे असें वाटुं देत नाहीं. थोड्या थोड्या अभ्यासानें, खुशमैजेनें, व त्याविषयीं फारसा विचार न केल्यानें तें जडतें व जडल्यावर सुटण्यास फार अवघड जातें. आपल्यांत अशी एक ह्मण आहे कीं, "जिभेची खोड मेल्यावाचून जात नाहीं" ती बहुत गोष्टींत खरी ठरते. ह्मणून आपण पहिल्यापासून अशी वहिवाट ठेवावी कीं प्रत्येक काम विचारानें करावें. व प्रती दिवशीं रात्रीं निजावयास जाण्याचे पूर्वी सार्‍या दिवसांत आपण कोणतीं कृत्यें केलीं, त्यांत कोणती करण्यास योग्य होती व कोणती नजर चुकीनें घडली वाईटावड ओढण्याजोगी आपल्या हातून त्याविषयीं मनन करावें चांगल्याविषयीं प्रशंसा व वाईटाविषयीं हळहळ करावी व वाईट कर्में आपल्या हातून उद्या घडुं द्यावयाचीं नाहींत असा निग्रह करावा. व त्याप्रमाणें झालें किंवा नाहीं हें नित्य तपाशीत जावें ह्मणजे मनुष्य मात्राचें वर्तन चोख, व दुसऱ्यांनीं कित्ता घेण्याजोगें होईल व कसलेंही दुर्व्यसन आपणास जडणार नाहीं.

मनाला सर्वकाळ शांत ठेवणें हेंही आपले कर्तव्यकर्मांपैकीं एक कर्म आहे. जगांत अशा बहुत गोष्टी आहेत कीं त्या केल्यानें, किंवा त्याच्या पाहण्यानें, अनुभवानें, किंवा संसर्गानें आपणास संताप, दुःख व त्रास उत्पन्न होतो. आणि असें घडते तेव्हां वेळोवेळ विवेकानें मनास धीर देऊन तशा वृत्ती पुन्हा न उचंबळतील अशी सवय केली पाहिजे. आतां कोणाच्या निर्दय किंवा दुष्ट कृत्यानें आपणास क्षोभ होणें हें वाजवी दिसते तरी त्यापासून मनाला पीडा होईल व शांतीचा सर्वस्वी भंग होईल इतकें दृढ मन त्यांत घालु नये अशी सवय केली पाहिजे.

इत्यादि बहुत गोष्टी स्वताच्या कर्तव्य कर्मांविषयीं आहेत त्यांतील विस्तार भयास्तव थोड्याचेच हेंही प्रदर्शन केलें आहे. आतां दुसरा प्रकार इतरांविषयीं कर्तव्यकर्में ह्मणून जो आहे त्याविषयीं थोडें सांगतो.

### लोकांविषयीं कर्तव्यकर्में.

आपल्या देहाशिवाय जे इतर ते लोक या सदरामध्यें येतात. त्यांत स्वकीय आणि परकीय असे पुन्हा दोन भेद आहेत. मातापितर, बंधुभगिनी, स्त्री, पुत्र, कन्या इत्यादि आप्त हीं स्वकीय होत आणि जीं आपलीं नातलग नाहींत ती परकीय होत. या सर्वांच्या संबंधानें जीं आपलीं कर्तव्यकर्में तीं लोकांविषयींचीं कर्तव्यकर्में होत. लोकांचें ऋण जसें आपणास अवश्य फेडावें लागतें तसीं हीं कर्तव्यकर्मेंही आपणास अवश्य आहेत.

माता पितर—ह्मणजे आई बाप ज्यांनी आपणास जन्म दिलें ते आप स इतर सर्वांचे आधीं पूज्य होत. पण केवळ मांसचा गोळा होतो, शीवे त्या कुशीस आवरणास होत नव्हते, रडण्याशिवाय आपणाजवळ सरें कांहीं हत्यार नव्हतें, केवळ त्यां कृपा हेंच आपणास जीवीन होतें वेळीं ज्यांनीं काळजीनें व कडीवाणानें आपलें संगोपन केलें, आपण चालावयास, बोलावयास. अन्नखाव शिकविलें, विद्येच्या मार्गास लाविलें आपले कल्याणाविषयीं अत्यंत प्रेम केलें त्यास आपण सर्वकाळ सुख णें, त्याचा सन्मान ठेवणें, व त्यांचे त्तम रितीनें पोषणकरणें हें आपलें व्यकर्म आहे. ज्यांनीं आपली सर्व क्ती व सर्व द्रव्य लेकरांचें सुखसोई खर्चल्यानें जे निःशक्त व निर्धन त्यांस त्यांच्या वृद्धापकाळीं तशा लेकरानीं सहाय न करणें, त्यांची न्नदशाकरणें, व त्यास गांजणें हें त अधमपणाचें काम होय व असें कोणी कुपुत्र करित असतील ते रूपी राक्षस समजावे.

बंधु— ह्मणजे आपले सहोदर त्यांच्या आपल्याएकरक्तमांसाच्या नें प्रिती, ममता, व सुखेच्छाही पाहिजेत तें आपण एके ठिकाणीं लो, खेळलों, विद्याशिकलों, व णापासून सदा सर्वकाळ एकत्र तेव्हां त्याचें सुख तें आपलें सुख, स दुःख तें आपणास दुःख, कल्याण तें आपलें कल्याण नें धर्म उत्पन्न होतो सबब पुढें ज्या भाग्योदयकाळीं आपण त्यांस तंर देऊं नये. त्यांवर प्रिती च त्यास आपल्याच्यानें करवेल तें य करावें हें आपलें कर्तव्य कर्म कोठें असें पाहण्यांत आलें आहे भाउबंद ह्मणजे आपले द्वेषी, त्यां खावलोकन करू नये, त्यांचे आपले मे निर्मे घर असलें तर मध्यें भिं लून संबंध तोडून टाकावा. नित हीं तरी भांडण उकरून काढावें, शि गाळी कराव्या मारामाऱ्या कराव्या, च्यावर कांहीं कुभांडें रचावीं, त्यांवर हीं अस्मानी सुलतानी आल्यास हर्ष व्हावे अशा प्रकारचे जे सहोदर ते भयंकर होत. अरण्यांत वाघापासून सरे हिंसक पशुपासून जितकें भय ति च गावांत त्या मनुष्यापासून भय पिंडापिंडाच्या प्रकृती भिन्न असतात त्यामुळें त्यांत मतभेद पडण्याचा व णुकीभिन्न होण्याचा संभव आहे तो होदर ह्मणून यांची ममतेची बंधने णदोरे का सारखीं तुटावी व ते एकमे वैरी व्हावेत हें चांगलें नाहीं. भावाभा कांहीं गैरसोयीच्या निवारणार्थ पाहिजे वेगळें राहावें पण त्यामुळें ममता कमी करूनयें व येकमेकास सहाय देण्याचें नये. कोठें असें ही आढळलें आहे धु बंधु बहूत दिवसाचे वैरी असतां प्र स ते येकमेकाच्या मोठे उपयोगीं आहेत हे येकून बरें वाटतें.

हें पत्र अकोला एथें खंडेराव ना फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २७ जुलई सन १८७३ इ० | अंक ३०

## जाहिरात.

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| मागाहून | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| मागाहून | २ |

## नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

खाली सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं मौजे अडोळ बुद्रुक तालुके जळगाव जिल्हा अकोले येथें गावकरी लोकांची खासगी शाळा आहे. तिजवर शिकविण्यास एक मास्तर पाहिजे. व त्यानें सरकारी लोअरक्लास स्कुलांत जसे शिकवितात त्या यत्तेपमाणें शिकविलें पाहिजे त्याजला हल्लीं दरमहा पगार रुपये १० दहा मिळेल व पुढें लायकी पाहून रुपये १५ पर्यंत केला जाईल. याजकरितां जे उमेदवार असतील यांनीं आपली लायकी आणि ठिकाण हें आह्मास पोस्टपेड पत्रानें कळवावें. म्हणजे आम्हास पसंत होईल त्या इसमास येण्याविषयीं आम्ही लिहूं व त्याप्रमाणें त्यानें हजर व्हावें. तारीख २३ माहे जुलाई सन १८७३ इसवी मुक्काम जळगाव.

मीर इनायत हुसेन तहशिलदार
तालुके जळगांव.

## नोटिसा.

नोटिस—अर्जुन वलद जानुजी खरबडकार राहणार मौजे खरबडी तालुके मुर्तिजापुर जिल्हे उमरावती यास खालीं सही करणार, दुर्गाजी वलद निधानजी वाघमारे राहणार मौजे मजकूर याजकडून देण्यांत येते कीं मजपासून शेत नंबर ३ याचा निमे हिस्सा पांचशे रुपयांवर स्टांप कागदावर खरीदखत लिहून घेऊन रजिस्टरही करून घेतला. सदरील रुपयांपैकीं वसूल मजला एकही रुपया दिला नाहीं. सबब या नोटिशीनें कळविलें जाते कीं, नोटिस पावल्या तारखेपासून पंधरा दिवसांत खरीदखताबद्दल रुपये देऊन रसिद घ्यावी. तसें न केल्यास शिरस्तेप्रमाणें तजवीज करणें भाग पडेल कळावें तारीख २१ माहे जुलाई सन १८७३ इसवी.

[सही] दुर्गाजी वलद निधानजी
वाघमारे यांची खुद
निशाणी असे.

नोटिस—वामनराव गोविंद जमादार वस्ती मुर्तिजापूर यास कळावें कीं, तुम्ही तारीख ११ जुलई सन १८७३इसवीची नोटिस वऱ्हाडसमाचारांत तारीख १३ जुलई सन मजकुरी दिली ती पाहिली तिचे उत्तर—

तुमचे नोटिसी प्रमाणें आह्मास तुमचें एक कवडी देणें नाहीं.

शिरस्त्याप्रमाणें तजवीज केलीत ह्मणजे शिरस्त्याप्रमाणे जबाब आहेत ते मिळतील.

"तुजकडे येणें आहे" अशीं अक्षरें नोटिसींत बुध्या घातलीं आहेत कीं काय? ह्याचें उत्तर आपण लौकर द्याल तर बरें पडेल. तारिख २० माहे जुलई सन १८७३ इसवी.

(सही) अमृतराव खुशालराव देशमुख देशपांडे प्र० मू०

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. मागील रविवारीं, संध्याकाळीं सुमारे५ वाजतां वाशिमचे लायब्ररींत सभा भरली होती. सभेचा उद्देश इतकाच कीं रा. रा. वामनराव प्रभाकर लायब्ररीचे माजी सेक्रटरी हे येथून अकोल्यास गेले याजकरितां त्यांचे जागेवर आलेले रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण यांस नेमावें. व त्याप्रमाणें त्यांस लायब्ररीचे सेक्रटरीही नेमिलें. आतां येथील सभेविषयीं थोडेंसे लिहितों:—येथील लोकांस सभा ह्मणजे काय हेंच माहित नाहीं मग सभेस बोलावल्यावर येऊन हजर होणें कसेंचे? बरें ज्या लोकांनां ह्मणून माहित आहे त्यांनीं तरी लायब्ररीचे सेक्रटरी यांचे बोलावण्यावर लागलीच यावें पण तेंही नाहीं यावें; कारण इतकेंच कीं त्यांस त्याची फारशी गोडी नाहीं. ते जर थोडासा लायब्ररी व सभा या पासून होणाऱ्या फायद्याचा विचार करूं लागतील तर त्यांचें त्यासच कळूं लागेल. आतां त्यांत मोठी आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं जे लोक दरबारांत वगैरे मोठमोठीं कामें करितात त्यांस देखील याची बिलकूल गोडी नाहीं मग नुस्ते दरबारांत क्वचित् वेळा जाणारे अथवा ती इमारत पाहणारे यांस कोठून असणार? व नसेल हें निर्विवाद आहे. असो यापुढें लोकांनां कित्येक आपले येथील पुढारी लोकांचे श्रमानें त्याची गोडी लागेल असें वाटते; व लायब्ररीचाही उर्जितकाळ येईल असें वाटतें. पुन्हां येत्या रविवारीं एक सभा भरणार आहे त्यांत लायब्ररी संबंधी कांहीं नियम वगैरे करण्याचा विचार होऊन पुढें महिन्यांतून निदान दोनदा तरी सभा भरवाव्या याबद्दल व निबंध वगैरे वाचण्याबद्दल विचार होणार आहे. व असें झालें तर खचितच आमच्या सारख्यावर पुढारी लोकांचे उपकार झाले असें आह्मी समजूं. पुढचे सभेंत काय काय होईल तें कळवीन.

आमचे डे० कमिशनर साहेब बहादूर हे आमचे नवीन आलेले डे. ए. इन्स्पेक्टर रा. रा. विनायकराव रामचंद्र यांस म्युनिसिप्यालिटीचे सेक्रेटरी अद्याप का नेमित नाहींत कांहीं समजत नाहीं. यांस नेमण्याविषयीं साहेब बहादुरांचा मानस नाहीं कीं काय? परंतु असें व्हावयाचें नाहीं असें आम्हास वाटतें. सेक्रेटरी यांसच नेमण्याविषयीं साहेब बहादुरास आमची शिफारस आहे. हे विद्वान् असून चांगले समंजस आहेत तेव्हां हे काम चांगले रीतीनें करतील यांत संशय नाहीं.

येथें ५।६ दिवसांपूर्वीं एका घरास आग लागून ३।४ घरांचा अगदीं राखरांगोळी झाली पाऊस नसल्यामुळें आगीची मोठी भीतीच होती आणि त्या दिवशीं बाजार असल्यामुळें त्या घरांतील माणसें बाजारांत गेलीं होतीं. मनुष्यहानी बिलकुल झाली नाहीं व दुसरें नुकसानही फारसें झालें नाहीं.

वाशीम ता. ८ माहे जुलाई सन १८७३

आपला मित्र
"लोकहितेच्छू."

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस. वाशिमाहून

वि. वि. या रविवारीं सभा भरणार ह्मणून मीं मागले पत्रीं लिहिलें होतें. परंतू येथें एक दिल्लीचे इंद्रजाल खेळ करणारे आले आहेत त्यांनीं आपला खेळ आजरोजीं केल्यामुळें सभा भरली नाहीं आधीच हौस आणि त्यावर पाऊस. असो पुढले रविवारीं तरी निर्विघ्नपणें सभा भरेल अशी आशा आहे.

वर लिहिल्या प्रमाणें खेळ झाला त्यांतील विषय येणें प्रमाणें (१) एक रुमाल जाळून पुन्हा जसाचा तसाच केला (२) पोटांतील आंतडीं बाहेर काढलीं (३) गंजिफेचें पान फाडून पुन्हां जसेंचें तसेंच केलें (४) एका रुमालाचे दोन्ही टोंकां मिळूंन एक गाठ देऊन ती हातानें न सोडतां नुस्ता रुमालाचा गुंडाळा करून सोडली [५] दोन १०।५ हात लांब घेऊन तो तोडून पुन्हां सबंद पोटांतून काढला(६)दोघांनीं दोहों बाजूंस दोरी दोन्ही टोंकांस धरली असतां त्यांत आंगठी अडकावून दाखविली (७)एक दम तीन सुया पोटांत घातल्या[८]एकच बूक प्रथमत: सगळें कोरें आहेसें दाखवून नंतर फारशी लिपींत लिहिलेलीं अक्षरें आणि ५।६ प्रकारचीं चित्रें दाखविलीं.(९)एका मुलाचे पोटांतून एक दोन आंडीं काढिलीं (१०) एका डब्यांत एक आंगठी घालून तेथून ती नाहींशी करून भलत्या एका मनुष्या जवळून ती काढिली [११] डोळ्यांनें बरीच मोठी एक वल्ली उचलली. (१२) एकाला एक प्यालाभर पाणी पाजून तेंच पाणी त्याचे हातांतून जसेंचें तसेंच बाहेर काढलें व आणखी कांहीं प्रकारचे खेळ करून दाखविले.

आतां त्यांतील २ | ३ शिवाय करून बहुतेक जनता सूक्ष्म रीतीनें पाहिले असतां सहज सर्व ध्यानांत येण्या जोग्या आहेत. दिल्लीचे लोक लुच्चे असा विषयीं प्रख्याति आहे. याप्रमाणेंच यांनीं ही एक येथें लुच्चेगिरी दाखविली ती अशी कीं नाटका प्रमाणें एक रुपया, आठ आणे, चार आणे, आणि दोन आणे असे दर ठेविले होते. खेळ चांगला असें समजून खेळास लोक बरेच जमले होते नाटका प्रमाणें जाहिराती लावल्या होत्या. जाहिरातींत लिहिलें एक आणि खेळांत केलें एक. हा खेळ बाजारीचे देवळा समोर धर्मशाळेंत झाला. त्यांस प्राप्ती सरासरी ५० रुपये झाली असें ऐकतो. एकंदरींत खेळ फारच वाईट झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. खेळवाले एथून लवकर जातील तर बरें, नाहीं तर लोक त्यांस फार त्रास देतील.

डे० कमिशनर साहेब बाहदुरांची स्वारी अकोल्याकडे गेली होती ती बुधवारीं रोजीं परत आली. हल्लीं येथेंच आहे.

इकडे पाऊस अगदीं नाहीं. पावसाकडे एकसारखे सर्वांचे डोळे लागले आहेत. तिगस्ता प्रमाणें यंदाही होतें कीं काय याची भीति पडली आहे. दोन प्रहरीं उन्हाळ्याप्रमाणें चांगलें ऊन पडून संध्याकाळीं थंडावा पडतो. अशी स्थिति आणखी कांहीं दिवस चालली तर लोकांची दशा फार वाईट होईल. ईश्वर करो आणि असें न होवो. पत्रविस्तार फार झाला याजबद्दल माफी मागून पत्र पुरें करतो. कळावें हे विनंती.

आपला मित्र
लोक हितेच्छु.

## वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ शुद्ध ३ शके १७९५

## वऱ्हाडचे साक्षीदार विलायतेस जातील काय?

हिंदुस्थानच्या जमाखर्चासंबंधीं चौकशीचें काम विलायतेस कमिटिपुढें चाललें आहे. हें आमचे वाचकांस ठाऊक आहेच. त्याचप्रमाणें त्या कमिटीनें या कामाकरितां हिंदुस्थानच्या रहिवासी माहितगारांच्या साक्षी मिळतील तर त्या अधिक उपयोगी पडतील असें आपलें मत दर्शविलें. त्यावरून विलायत सरकारानेंही ती गोष्ट मान्य करून हिंदुस्थान सरकारास कळविलें कीं कोणी नेटिव गृहस्थ विला

लायतेस साक्षी देण्याकरितां येण्याविषयीं आपली इच्छा दर्शवितील तर त्यांचे अर्ज घेऊन इकडे पाठवावे. त्यावरून हिंदुस्थान सरकारानें इलाख्या इलाख्याच्या सरकारास कळविलें कीं तुमचेकडून असे नेटिव लोक साक्षीस जाण्यायोग्य असतील त्यांचीं नावें कळवावीं. व त्याशिवाय जे लोक उत्सुक असतील त्यांनीं अर्ज करावे असा ठराव केला. इलाख्याच्या सरकाराकडे अर्ज करण्याची मुदत तारीख १४ जुलाईची ठरविली होती, व हिंदुस्थान सरकारापुढें आलेलीं नावें तें २१ वे तारखेस विलायतेस पाठविणार होते त्याप्रमाणें नावनिशी गेली असेल पण ती प्रसिद्ध झाली नाहीं ह्मणून एकंदर किती लोक हिंदुस्थानांतून विलायतेस साक्षीकरितां जाण्यास तयार आहेत किंवा किती जणाची सरकारानें शिफारस केली आहे तें अजून कळलें नाहीं.

मुंबई इलाख्यांतील व बंगाल इलाख्यांतील वर्तमानपत्रांवरून १०—२० गृहस्थांचीं नावें लोकमुखीं झालीं आहेत. त्यांतून कित्येकांनीं आपण स्वतां होऊन जाण्याचे अर्ज केले आहेत, पुण्याच्या सार्वजनिक सभेनें कित्येक थोर, विद्वान, व माहितगार गृहस्थांस पत्रें लिहून त्यांची संमती आणिली व त्यांचीं नावें सरकारास लिहून कळविलीं. व सरकारचे हुकुमावरून जिल्ह्या जिल्ह्याचे कलेक्टरांनीं आपले प्रांतांतील लायक मनुष्यांचीं नावें सरकारास कळविलीं आहेत तेव्हां त्या मानानें ही यादी बरीच फुगली असेल परंतु तितक्या सर्वांवर जाण्याची पाळी येईल असें नाहीं. कोण मनुष्य कोणत्या प्रकरणीं माहिती सांगणार व त्याची योग्यता कशी काय आहे तें हिंदुस्थान सरकारचें लिहिण्यावरून समजून घेऊन विलायतेंतील कमिटी आपणास पाहिजे आहेत तेवढे साक्षीदारांची निवड करणार आहे. व तिकडून अमुक लोक आले पाहिजेत असें लिहून आलें म्हणजे हिंदुस्थान सरकार त्यास कळवितील मग त्यांनीं जाण्याची तयारी करावी. अर्जदारांपैकीं कोणास जावें लागणार व कोणास नाहीं, त्याविषयीं कळवेल तितके लौकर हिंदुस्थान सरकार कळविणार आहे. व ज्यांना जावें लागेल त्यांना सन १८७४ च्या आरंभापूर्वीं जावयाला नको आहे असेंही हिंदुस्थान सरकारानें हल्लीं कळविलें आहे.

हिंदुस्थानसरकार उधळेपणानें खर्च करिते, व रयतेची सोय न पहातां जबरदस्त कर बसविते अशा बोभाट्यावरून चौकशी करितां ही कमिटी नेमली गेली आहे त्यावरून ही हिंदुस्थानांत भरणें अवश्य होती पण सरकारानें ऐकिलें नाहीं, त्या कामीं कोणाचा काय इलाज? म्हणच आहे कीं, "सत्तेपुढे शहाणपण चालत नाहीं." अस्तु. कमिटी विलायतेस बसली पण हिंदुस्थानांतील लोकांच्या साक्षी करितां तिजमधील कांहीं मेंबर हिंदुस्थानांत येते तर फार चांगलें झालें असतें व तशाविषयींही मागणी झाली होती पण सरकारानें ऐकिली नाहींत. शेवटीं हिंदुस्थानचे लोकांस; साक्षीकरितां विलायतेस जाण्यास सोय व्हावी ह्मणून सरकारानें एक गोष्ट केली ती ही कीं, जे साक्षीदार विलायतेस जाऊं इच्छितील त्यांस वाट खर्च व तेथें लागेल तो जरूरीचा खर्च पुरविण्याकरितां एक लाख रुपयांचें सांगशन केलें. सरकारचा अजमास आहे कीं, एक मनुष्यास सुमार तीन हजार रुपये खर्च लागेल व त्या मानानें एवढ्या रकमेवर तिसाहून अधिक साक्षीदार जावेत असें आहे—आतां पुढें प्रकार कसा होतो तो पाहूं.

हिंदुस्थान सरकारानें या बाबतींत केलेल्या जाहिरनाम्याची एक प्रत आमचे वऱ्हाडचे श्रेष्ठ सरकार मेहेरबान रेसिडेंट साहेब यांजकडेही पाठविली व एक अकरा कलमाचे त्या सोबत पत्र ही लिहिलें त्यांत असें लिहिलें आहे कीं, (इंग्लिश) जाहिरनामा तरजुम्यासहित तुम्ही आपले सरकारी वर्तमानपत्रांत लवकर प्रसिद्ध करावा त्याप्रमाणें पाहिलें असतां रेसिडेंट साहेबांनीं रेसिडेन्सी आर्डरमध्यें सदरहू जाहिरनाम्याचा मराठी तरजुमा मुळींच प्रसिद्ध केला नाहीं. व इंग्लिश जाहिरनामा ९ वे तारखेच्या रे० आ० मध्यें छापिला आहे. ती आर्डर हैदराबादेहून छापल्या दिवसापासून आठदहा दिवसांचे आंत बहुशा कधीं पोचत नाहीं सदरहू आर्डर १९ वे तारखेस इकडे वाटली गेली तेव्हां विलायतेस साक्षी करितां जाण्याचे अर्ज करण्याची कोणास इच्छा असली तर ती जागचे जागीं राहिली असे आह्मी ह्मणतों. कारण वऱ्हाडांतून कोणी अर्ज पाठविला असतां चालेल ही गोष्ट सदरहू रेसिडेन्सी आर्डरवरून मुदत टळल्यावर इकडील लोकास समजली हें चांगलें झालें नाहीं असें आह्मी ह्मणतों.

वऱ्हाडांतून अशा कामाला अगदीं लायक असे मनुष्य दुर्मीळ तर खरे तथापि हिंदुस्थान सरकारानें इंग्लिश भाषा येत नसलेलेही चालतील अशा अर्थाचें पत्र लिहिलें आहे त्यावरून वऱ्हाड प्रांताची चांगली माहिती सांगणारे व त्यावरून इंग्लिशसरकारचा उधळेपणाचा खर्च व त्रासकारक कर यां विषयीं कमिटीची खात्री करणारे असे एकदोन तरी गृहस्थ निघाले असते अशी आमची अटकळ आहे. मेहेरबान दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब असिस्टंटकमिशनर, मे० शेख हिसामोदीन असिस्टंट क्यांटनमेंट माजिस्ट्रेट सिकंदराबाद, हे सरकारी कामदार व जमीदारां मध्यें येकादा स्वतंत्र गृहस्थही साक्षी करितां कदाचित तयार झाला असता असें आह्मांस वाटतें.

वऱ्हाडांत पोलिसपट्टी सारखे अडमाप कर, मिठांच्या विहिरींची बंदी, तेणेंकरून मिठावरील जकात, लाकडावरील कर, तसेच एवढ्याशा टापूला सहा जिल्हे व त्यांतून तालुके पाहिले तर दोन किंवा तीन, आणि युरोपियन आफिसर दहा बारा, कामें पाहिलीं तर गरज नाहीं अशा ठिकाणीं च्यार च्यार लाखाच्या बराकी, सामान्य गावाला सवा सवा लाखाचे पूल, व पाव पाव लाखाच्या इमारती, अकोल्याचा टौनहाल मिडलक्लास स्कूल वगैरे) बांधल्या बरोबरच त्यांना मळमपट्या हे प्रकार त्याप्रमाणें ३० किंवा ४० मुलें शिकवावयाला च्यार च्यारशे रुपयांचे युरोपियन मास्तर व हजार हजार रुपयांचा महिना खर्च! या हिंदुस्थान सरकारच्या गोष्टी विलायतच्या कमिटीपुढें सविस्तर सांगितल्या असतां अनवश्यक किंवा कमी महत्वाच्या ठरतील असें आह्माला वाटत नाहीं. या जकरितां आमच्या इकडूनही कोणी साक्षिदार जाते तर मोठा उपयोग झाला असता, परंतु तें घडतें कसें? व घडविण्याची इच्छा कोणाला?

## पारशी लोकांविषयीं.

आमच्या देशामध्यें महाराष्ट्र, गुर्जर, भाटे, कर्नाटकी, यहुदी, मुसलमान इत्यादि बहुत प्रतीचे लोक आहेत त्यामध्यें सुधारणेचा जो अंकुर दिसतो त्यापेक्षां पारशी लोकांत फार अधिक दिसून येतो. तें बहुतेक सर्व सुधारणेच्या कामांत आमच्यापुढें जाऊन युरोपियन लोकांच्या खालोखाल तयार होऊन राहिले आहेत. पारशी लोकांचे व्यापार, पारशी लोकांचे कारखाने, पारशी लोकांचे उद्योग, आणि पारशी लोकांचें वैभव पाहून आह्मास परम संतोष वाटतो. भीक मागणारा पारशी कोठेंच दृष्टीस पडावयाचा नाहीं. कां तर तशा प्रतीच्या अपंग लोकांचें संरक्षण पारशी लोकांच्या धर्मार्थ फंडांतून व श्रीमान लोकांच्या औदार्यानें होत असते. ही गोष्ट तर ब्राह्मण लोकांनीं मोठी विचार करण्याजोगी आहे, आमच्या भिक्षुकांच्या टोळ्याच्या टोळ्या एकेक पैशाकरितां नित्य दारोदार कशा हिंडत असतात व त्या यजमानांला कशा त्रास देत असतात तें पाहिलें ह्मणजे पारशी लोकांचें उदाहरण फार उत्तम दिसतें. पण तें आमच्या अफाट समुदायाला योग्य वाटून व घेण्याविषयीं त्यांची एकी होऊन घेतलें गेलें असतां फार उत्तम आहे; नाहींपेक्षां भिक्षुकांच्या दिवसानुदिवस पारावार नाहींसा होईसार होईल. व तेणेंकरून आमचे लोकांस अधिक दारिद्र्य येईल. अस्तु. पारशी लोकांच्या लक्षावधी रुपयांच्या औदार्याविषयींच्या गोष्टी आपच्या वाचकांस बहुत टाऊक असतील.

पहिले सर जमशेटजी जिजीभाई बारोनिट साहेब यांनीं आपल्या हयातींत २९ लाख रुपये परोपकारार्थ खर्चिले, सर कावसजी जहांगीर रेडीमनी यांनि लक्षावधी रुपये लोकोपयोगी कामासाठीं खर्चिले बाटलीवाले यांचे चिरंजीव आनरबल रुस्तुमजी शेट यांचें देखील लक्षांवधि रुपयांचे औदार्य प्रसिध्द आहे. एका पारशी गृहस्थांनीं १०० पारशी विकाऊ तरुण लोक आपल्या सुताच्या व कापडाच्या गिरणी मध्यें पगार देऊन ठेविले आहेत व दुसरे एका पारशी गृहस्थानें आपली ४०० खोल्यांची चाळ त्या लोकांना फुकट राहाण्या

ला दिली आहे हें परोपर्गाचें औदा
र्य वर्णनीय होय.

यांप्रमाणें मुंबईस नुकताच
लोकांवर जो खटला चालला होत
त्या जातीचें ऐक्य व धर्माभिमान
दिसून आला. शंभर पाऊणशें पा
कानीं आपल्या प्रेत भूमी नजी
क हिंदुगृहस्थ मोठ्या गुपचुपीनें
बांधीत होता तें पाहून एकदम
अरशाच्या टोळीनें त्याची ती इमारत
दोस्त केली. मुंबई सारख्या
असे उदाहरण मोठेंच हिमतीचें
क्याचें होय यांत संशय नाहीं. पोलि
न त्यांची बरीच अप्रतिष्ठा झाली
दे त्या लोकांची माजिस्ट्रेटाकडे
शन कोर्टाकडे चौकशी झाली तो
टीं ते निर्दोषी ठरले. त्या कामांत
लोकांनीं ७ बारिस्टर उभे केले हो
यांस दोन्ही कोर्टें मिळून एकंदर
३९००० रुपये लागला व सिवा
ह्यामुळें आतां आनंदोत्साहाचा
चें लागेल तो वेगळाच. आमचे
त आहे कीं मुकदम्यांत सापडले
शी लोक केवळ गरीब होते व
खर्च त्यांच्या मंडळांच्या फंडांतू
विला गेला!

याप्रकारचें ममत्व व याप्रकारचें
आमच्या देशांतील सर्व प्रतीच्या
आलें पाहिजे ह्मणजे त्यांची खरोख
धारणा झाली असें ह्मणता येईल.

## पंढरपुरचा विठोबा.

दक्षिण हिंदुस्थानांत पंढरपुरच्या
वा सारखें देवस्थान दुसरें नाहीं.
डो कोसांवरून लक्षावधी भक्तसमाज
याचे दर्शनास प्रतिवर्षीं आषाढ मा
कार्तिक मासीं जात असतो. इत
च्या ठायीं लोकांचें दृढतर प्रेम
कोणी दुष्टबुध्दीनें त्या विठ्ठल
प्रहार करून तिचा अंशतः भंग
असें वर्तमान आलें आहे हें ऐकून
लोकांस हळहळ लागल्यावाचून र
नाहीं.

गेल्या रविवारीं ह्मणजे आषाढ
११ चे दिवशीं सकाळीं १०
पांच च्यार वैरागी पंढरपुरीं विठोबा
वळांत दर्शनास गेले होते त्यांतील
हातांत कवठाएवढा शाळिग्राम होत
त्यानें विठोबाचे डावे पायावर घोट्या
चे बाजूस दोन वेळां मोठ्या जोरानें
ला तेणेंकरून मूर्ती सिंहासनापासून
व पायाची बरीच मोठी खपली उ
कोणी लिहितात कीं, पाय तुटून
पुढें वडल्यानीं मूर्तीच्या मागल्या
एक प्रभावळ ठेवून चुन्यानें वगैरे
पक्की केली. त्या वैराग्यांस पोलि
पकडलें आहे. मूर्ती फोडणारा
कीं, माझ्या गुरूनें मला असें करा
सांगितलें. तो गुरू साच्या सम
आहे व तो आपण असें सांगितल्याचें
करितो. आणखी असा बूट
आहे कीं, तो मुसलमान आहे.

…ा हे असें दुष्कर्म करून …त्रास व दुःख देण्यांत काय …तो असो. पण आह्मास …र्यांणीं हे अति नीचपणाचें क…. विठोबा हा कांहीं मनुष्य …कीं आळा मारून त्याची खोड मोड… किंवा पंढरपुरच्या विठोबावरील …ांचें प्रेम असें कमी नाहीं कीं, तें …फुटल्यानें नाहींसें होईल. लोकांनां …ाना हवा आहे व त्याचें महात्म चालाव… आहे तर लोक दुसऱ्या दगडाचा …विठोबा करितील किंवा आहे त्यासच …ून जोडून साजरा करून भजतील. …त्या वैराग्याला असें करण्यांत काय …ळालें? कांहीं नाहीं.

तथापि कोणाची एक अशी कल्पना …हे कीं, तो कदाचित् जगिक दुःखानें …जला असावा व या जागती जोत …ागि सर्वप्रिय देवाचा साक्षात्कार पडावा …तो त्याचे मनांत येऊन त्याणें हे दिव्य …चकलें असावें. आणि असें असेल तर …ा विठोबाच्या मूर्तीला, हे अवश्य होते …ीं, तिनें आपला बढगा दाखवावयाचा …ता. म्हणजे देवावर हात उगारतो …ाहि इतक्यांत त्याचे हात गळून पडावया… होते किंवा मारल्याबरोबर तो मरून …ावयाचा होता. पण असें कांहींच …लें नाहीं. पुराणांतल्या गोष्टी पुराणांत …हिल्या आणि एखाद्या निराश्रित गरीबा…ारला विठोबानें मार खाल्ला तेव्हां अश्र…धाळू लोक त्याविषयीं काय कल्पना …रितील? अस्तु. हे इसवी सन …१८७३ चे वर्ष सुधारणेच्या पुढल्या पावला…चें आहे ह्मणून विकल्पाविषयीं फारशी …ाळजी नको.

## सुबोधपत्रिका.

यानावाचें मुंबईत एक पैसा किमतीचें …ाठवड्याचें नवीन मराठी वर्तमानपत्र आ…ीकडे निघूं लागलें आहे. याची एक प्रत …याच्या कर्त्यांनीं आह्मांस पाठविली ती …आदरपूर्वक आह्मी कबूल केली. यापत्राचें …लेहिणें सभ्य व अगत्याचें आहे. याच्या …र्त २५०० प्रति निघताहेत. मुंबई शह…ात रस्तोरस्ती एक पैसा द्यावा व पत्र …यावें असा याचा खप होत असतो. बाहेर …ाती हो दहा, चाळीस, शंभर, अशीच …ा अशा प्रती एकेक गांवां जातात याचे …डिटर पगार घेत नाहींत. व छापखानेवा…ही अगदीं थोडी छापणावळ घेतात …पाहून आह्मास संतोष वाटतो. विलाय…तकला सारखा अशा पत्राचा पुष्कळ ख…व्हावा असें आह्मी इच्छितो.

## वऱ्हाड

पर्जन्यावाचून लोक फार हवालदील …ाले होते परंतु लिहिण्यास संतोष वाट…तो कीं गेल्या गुरुवारपासून तीन दिवस …ाज पाऊस एकसारखा लागून त्यानें शे…तकरी लोकांस आनंदी करून सोडिलें …आहे. हा पाऊस लांबवर असावा असें …याचे लक्षणावरून दिसतें.

…शहरांतील डेंग्यु तापाची साथ अजून …ओसरत नाहीं याबद्दल वाईट वाटतें. कित्येक घरांतून या तापाचा प्रवेश होऊन कित्येक मनुष्यांस त्यानें मागेंच गाठलें होतें पण चमत्कार हा कीं, त्याच घरांत त्या वेळीं ताप न आलेल्या माणसावर तापाची पाळी आली आहे. तीन च्यार दिवसांत ताप बरा होतो पण हात पाय वगैरे दुखावयाचे कित्येक दिवस राहत नाहींत. लहान मुलांस हे दुखणें फारच जाचतें. दुःखांत सुख इतकेंच कीं या पासून मनुष्यहानी कांहीं नाहीं.

—०००—

बाहेर गावाहून कित्येक युरोपियन येथे आले आहेत व त्यांचे क्रिकेट खेळ चालू आहेत. काल रात्रीं मि॰ क्यांडी साहेब डायरेक्टर व यांची मंडळी यांनीं नाटक केलें तें फक्त युरोपियन लोकांकरितांच होतें असें समजतें.

—०००—

रा. रा. एकनाथ मोरेश्वर तहशिलदार यांची मेहकर तालुक्यास बदली झाल्या प्रमाणें ते तेथें जाऊन, गेल्या सोमवारीं आपले कामावर हजू झाले. व मि॰ दो राबजी काबसजी शुक्रवारीं खामगावास जाऊन काल त्यांनीं आपले कामाचा च्यार्ज घेतला. आतां रा. रा. सखाराम दत्तात्रय एक दोन दिवसांत अकोटास जातील.

—००—

वऱ्हाडांतील पोस्टाचे इन्स्पेक्टर मि॰ मेकलागिनन साहेब यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतली. त्यांचे जागेवर अकोल्याचे पोस्टमास्तर मि॰ फर्थ साहेब यांस नेमिलें व अकोल्यास रा. रा. गोपाळ नारायण पश्चिम वऱ्हाडचे सब इन्स्पेक्टर यांस पोस्टमास्तर नेमिलें.

—०००

अकोल्याचे डिपुटि कमिशनर आफिसांत लोकलफंडाकडे मि॰ परशाराम या नावाचा ८५ रुपयांचा क्लार्क होता त्यास कांहीं काम येत नाहीं ह्मणून त्या जागे वरून काढून २५ रुपयावर नेमिलें. व ती ८५ रुपयांची जागा पुण्याचे रा. गंगाधर बाळकृष्ण सोहनी यांस दिली. यांनीं तूर्त तीन महिने ६० रुपये पगार घेऊन प्रोबेशनवर काम पाहावें असें ठरलें आहे.

—०००—

अकोटचे माजी तहशीलदार रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे यांनीं राधा गोसाविणीच्या कैवारास्तव तिच्या नवऱ्याच्या भावाला कैदेची शिक्षा दिली असा त्यावर हुजूर अर्ज झाला होता त्याची डिपुटि कमिशनर साहेबांनीं चौकशी करून व कैदीकडून अपील आणवून घेऊन त्याची तत्क्षणीं सुटका केली अशा गैरगोष्टी आणली त्यांकडून घडून येत ह्मणून त्यांची कमिशनर साहेबांनीं बदली केली असेल तर आतां तरी त्यांनीं सावध व्हावें.

—०००—

बुलढाण्याकडील दोन चिफ कानस्टेबल नुकतेच गुन्ह्यांत येऊन कैदेची शिक्षा पावून एथील जानमठात गेले आहेत. यांपासून इतरांनीं बोध घ्यावा.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. नरसिंगराव रामचंद्र मुनशी यांना वाचे अकोल्यास एक वकील होते ते गेल्या मंगळवारीं सायंकाळीं मरण पावले. प्रतिष्ठित वकिलांत यांची गणना असून पर शियन यांस चांगलें येत होतें असें ह्मणतात.

—०००—

वाशिमाकडे पाऊस नाहीं. लोक वाट पाहून आहेत असें आमच्या बातमीदाराच्या १५ वे तारखेच्या पत्रावरून कळतें. पण आतां तिकडे पाऊस पडला असावा असें वाटतें.

## वर्तमानसार

नवीन क्रिमिनल प्रोसिजरचा कायदा आहे तो कोल्हापुर संस्थानांत आक्टोबर महिन्यांत चालू होणार आहे. हा कायदा फार सक्त व रयतेच्या गैरसोयीचा ह्मणून इंग्लिश राज्यांतील रयत हाका मारित असतां नेटिव राजांनींही आपले संस्थानांत तो चालू करावा ह्मणजे किती विलग गोष्ट आहे!

हिंदु व मुसलमानी शास्त्रांचीं मूलतत्वें यावर मेकनाटन साहेबाचा ग्रंथ आहे त्यावर टिपा व आणखी शोध घालून मि॰ गिरीशचंद्र तारकालंकार कलकत्ता हायकोर्टाचे वकील यांनीं नवीन प्रत तयार केली आहे व तिची किंमतही थोडी ठेविली आहे असें ह्मणतात.

विलायतेस साक्षी देण्याकरितां मुंबई इलाख्यांतील गृहस्थांत राव बहादूर महादेव गोविंद रानडे हे सर्वांशीं योग्य आहेत अशी टाइम्स कर्त्यानें त्यांची शिफारस केली आहे. त्याचप्रमाणें गुजराथेंतील मि॰ जव्हेरीलाल उमियाशंकर हे जातील तर फार चांगलें असें तो पत्रकर्ता ह्मणतो.

मि॰ अशबर्नर साहेब रिविन्यु कमिशनर यांनीं मि॰ नवरोजी फर्दुनजी यांची विलायतेस साक्ष झाली तींत कांहीं दोष काढिले आहेत.

आगष्ट महिन्यापासून जी आय. पी. कंपनी कापड व सूत यांवरील भाड्याचे दर कमी करणार आहे त्याचप्रमाणें दीडशें मैलाहून कमी अंतराचे स्थळीं जाण्याचीं रिटर्न टिकिटें घेतल्यानंतरच्या दिवशींही उपयोगास आणितां यावी अशी तजवीज करणार आहे.

बंगाल इलाख्यांतून १४ व मुंबई इलाख्यांतून १० अर्ज विलायतेस साक्षी करितां जाणाऱ्या लोकांचे सरकारांत गेले आहेत असें समजतें.

पुण्यास सपटंबरचे १० वे तारखेस कलाकुशलतेचें प्रदर्शन होणार आहे.

मि॰ क्यांडी साहेब मुंबईच्या एल्फिनस्टन कालेजांतील प्रोफेसर पेनशन घेणार व दुसरे प्रोफेसर मि॰ वेडर्न हेही रजा भरतांच राजिनामा देणार असें कळतें.

मुंबईचे पोलिस कमिशनर मि॰ सूटर साहेब यांचा पारशी लोकांचे प्रेतस्थानासंबंधी मुकदम्याचे पूर्व भागांत कांहीं दोष आहे असें परिस्फूट झालें आहे.

गुजराथेंत तीन सख्या भावांनीं मिळून एकाला कुऱ्हाडीनें ठार मारिलें त्याबद्दल त्यावर आरोप ठेवून त्यांस हद्दपारची शिक्षा दिली.

इराणच्या शहानें मुंबईच्या पारशी लोकांचा अर्ज वाचून पाहून त्यांस कळविलें आहे कीं, आह्मी परत जातांना तुमच्या गैरसोयीविषयीं विचार करून बंदोबस्त करूं.

नवानगर व पोरबंदर या संस्थानांत पोलिसाचा बंदोबस्त कमी आहे ह्मणून तिकाडिल पोलिटिकल एजंटानें त्यांवर दहा व दोन हजारांची गुन्हेगारी बसविली.

जोधपुरचे महाराज सिमल्यास जाणार होते.

झांजीबारच्या सुलतानानें गुलामाचा व्यापार मना करण्याचें कबूल केलें व त्या प्रमाणे आपले राष्ट्रांत जाहिरनामे फिरविले.

मुंबई शहराच्या पैमाषीचें काम सन १८६५ साली चालू झालें होतें तें सन १८७२ त संपलें त्याचा रिपोर्ट हल्लीं प्रसिद्ध झाला आहे. कर्नल लाटण साहेब त्यावर मुख्य होते. या कामाला खर्च ३१३०६२ रुपये लागला. मुंबई बेटाचें क्षेत्रफळ २२ चौरस मैल आहे व जमीन बाब उत्पन्न सवालाखाचें आहे.

पंजाब प्रांतांत मिठाचे पर्वत आहेत त्यावर उत्तम व विपुल मीठ आहे तसें दुसरे देशांत कोठेही नाहीं व त्यापासून सरकाराला मोठें उत्पन्न आहे असें समजतें.

…हिंदुस्थानचे सेक्रेटरी आव स्टेट.—विक्टोरिया राणीचे व्याही ड्यूक आव आर्गाईल हे हल्लीं हिंदुस्थानचे सेक्रेटरी आव स्टेट ह्मणजे हिंदुस्थानचे मुख्य प्रधान आहेत. यांचा अधिकार गवर्नर जनरलपेक्षां मोठा आहे. हिंदुस्थानसंबंधानें एका हिशेबानें यांस विलायत सरकार ह्मणण्यास चिंता नाहीं. हल्लींचे सेक्रेटरी आव स्टेट यांचे हिंदुस्थानच्या कमाईकडे अगदीं लक्ष नाहीं असा फार बोभाट आहे. याजविषयीं मुंबई ग्याझेटाचा बातमीदार असें लिहितो कीं, विलायतेंतील एकाद्या मोठ्या जागेवर ड्यूक आव अर्गाईल हे फार वेळ टिकले नसते. परंतु हिंदुस्थानच्या कारभारावर पाहिजे तसा मनुष्य खपतो. यांचांत प्रधानकीचें कर्तृत्व कांहींचें नाहीं. ,,यामुळें हिंदुस्थानची हेळसांड अवलपासून अखेरपर्यंत होत आहे. ड्यूक आव अर्गाईल हिंदुस्थानचे सेक्रेटरी झाल्यापासून यांच्या हातून या देशाच्या कल्याणाचें ह्मणण्यासारखें एकही काम झालें नाहीं. परंतु त्यांनीं हिंदुस्थानच्या खर्चानें आपल्या देशबांधवांचें मात्र कल्याण केलें आहे. मुंबई सरकारची अशी चाल दिसते कीं एकादा लट किंवा गैरहुशार अधिकारी असला ह्मणजे त्यास खानदेश किंवा सातारासारख्या कोपऱ्यांतील जिल्ह्यावर नेमावा. विलायतेंतील प्रकारहीकांहीं सा असाच दिसतो.

अमेरिकेंतील कारोलिना प्रांतांतील तांदळाची मुंबई इलाख्यांत सिंध व अहमदनगर, ठाणें वगैरे जिल्ह्यांत गुदस्तसालीं लागवड करून पाहिली होती. परंतु या जातीचे भात या देशांत चांगलें होत नाहींत असें अनुभवास आलें आहे.

विलायतचा व्यापार—गेल्या जून महिन्यांत विलायतेहून परदेशीं २० कोटि रुपयांचा माल गेला व विलायतेंत परदेशाहून ३० कोटि रुपयांचा आला. यावरून एका जून महिन्यांत विलायतेंत १० कोटि द्रव्य राहिलें असें होतें. तेव्हां व्यापारसंबंधानें विलायतेनें इतर देशास व मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानास किती ग्रासलें आहे हें लक्षांत येईल. ने. ओ.

अमेरिकेंत विद्येस लोकांची मदत—सन १८७१ सालीं अमेरिकेंतील लोकांनीं खासगी रीतीनें एक कोटि ऐंशी लक्ष रु. व १८७२ सालीं दोन कोटि रु. विद्यावृद्धी करितां दिले; आपल्या लोकांनीं ही विद्यावृद्धीचें काम मनावर घेऊन असा खर्च केल्याशिवाय होण्याची आशा नाहीं.

अहमदाबादचे लोक तेथील स्माल काजकोर्ट बंद करण्याविषयीं अर्ज करणार आहेत.

आनंद व डाकूर यांजमध्यें रेल्वे करण्याची सरकारानें मंजुरी दिली.

विलक्षण शोध—जिनें लिहिलेलीं अक्षरें शंभर वर्षें पर्यंत वाळत नाहींत अशी शाई सांपडली आहे.

पुणे शहर व लष्कर मिळून ४१२ पोलिस शिपाई संरक्षणास आहेत असें कळतें.

निजाम, बडोदेकर व म्हैसूरकर यांस इंग्रजी हद्दींत फक्त १९ तोफांचा सन्मान मिळावा असें स्टेटसेक्रटारीनीं ठरविलें.

नवीन दररोजचें मराठी पत्र—ज्ञानमित्र नांवाचे पुढच्या महिन्यापासून निघणार आहे असें वां. ग्या कर्ते ह्मणतात.

सन १८४२ पासून आजवर हिंदुस्थानांतून पांच लक्ष बिगारी परमुलखास गेले असें सरकारी रिपोर्टावरून कळते.

रशियन वर्ल्ड पत्रांत कान्स्टांतिनोपलचा वातमीदार ह्मणतो कीं, रशियन लोकांनीं खिवा घेतला ह्मणजे ते तीन महिन्यांत हिंदुस्थानावर हल्ला करूं शकतील व हिरातावर फौज बारा दिवसांत नेऊं शकतील. इं. प्र.

नाशिक—आकाश नेहमीं अभ्रानें आच्छादित असून पर्जन्यानें पुनः उघाड धरली. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं. ना. वृ.

सातारा—आतां कांहीं दिवस पर्जन्य बंद राहिलातर बरें, नाहीं तर पिकें उफाल्यास यावीं तशीं येणार नाहींत असें शेती लोक ह्मणूं लागले आहेत. शहरांतले लोकही थोडे दिवस पाऊस बंद रहावा अशा आशेस आले आहेत. शु. सू.

दस्तुरी बरून कोणी सरकारी कामगार सकुटुंब जात असतां ठरावाप्रमाणें नाकेवाल्यानें कामदारा जवळून दस्तुरी न घेतां त्याचे कुटुंबाबद्दल मागितली ही गोष्ट सरकारास समजल्यावरून त्या बाबदींत सरकारानीं असा ठराव केला कीं, सरकारी कामगारांच्या सामानांतच त्याच्या बायकाचा समावेश होतो असें समजून दस्तुरी घेऊं नये. न्या. सिं.

सोलापूर—या आठवड्यांत पाऊस पडला नाहीं परंतु अभ्रें मात्र हमेशा असून थंडी आहे. क. त.

आपला देश दिवसानुदिवस दैन्य दशेप्रत कां येत चालला आहे याचीं कारणें शोधण्याकडे कांहीं स्वदेशकल्याणेच्छु जनांचें चित्त लागून त्यांणीं प्रथमारंभीं विलायतेवर न राहातां ह्या देशांत उत्पन्न होणारीं वस्त्रें वापरावी असा निश्चय केला आहे. या निश्चयास बहुत लोक अनुसरत आहेत. ही गोष्ट विलायतेंतील व्यापाऱ्यांस कळल्यावरून तेथें कापडावरील सरकारी जकात कमी व्हावी म्हणून त्यांणीं अर्ज केला आहे अशी वदंता उठली आहे. कदाचित जकात कमी झाली तर विलायती कापड स्वस्त होईल व एथील लोक तेंच घेऊं लागतील. परंतु परदेशीय लोक आमचे सर्वस्व नाहींसें करीत आहेत इकडे आमचे बंधु जनांनीं डोळे खुले करून पाहावें आणि आपल्या स्वदेशांत उत्पन्न झालेल्या कापडाचा उपयोग करण्याचा निश्चय दृढतर करावा.

वायव्यप्रांतांतील कांहीं भागांत धान्याची किंमत फार चढली आहे.

असें कळतें कीं रशियन लोकांच्या हालचालीमध्यें काबूलच्या अमिराचा संबंध आहे.

गेल्या मेलवरून कळतें कीं बाबू लालमोहन, बाबू रासल चंदरराय व कृष्ण गोविंद गुप्त हे बारिस्टरच्या परिक्षेत पास झाले. यापैकीं दुसरे गृहस्थ लंडन येथील युनिव्हर्सिटी विद्यालयांत शिकलेले असून सिव्हिलसर्विसच्या परिक्षेंत पसार झाले आहेत. सु. प.

रत्नागिरीच्या कांहीं वकिलांनीं एक मंडळी स्थापून दावे वगैरे विकत घेऊन भांडण्याचा क्रम सुरू केला आहे असें एका अर्जावरून तेथील जज्जाच्या समजण्यांत आल्यावरून ती गोष्ट जज्जानें हायकोडतास कळविली व त्यावरून ता. २६ एप्रिल १८७३ रोजीं हायकोडतानें नं. ३२९ चा असा ठराव केला कीं, तेथील प्रत्येक वकिलानें वरील प्रकारच्या मंडळीशीं माझा कोणत्या ही रीतीनें संबंध नाहीं अशी दोन महिन्याच्या आंत तेथील जज्जाची खात्री करावी व जे तसें करणार नाहींत त्यांच्या सनदा रद्द केल्या जातील. शिवाय ही गोष्ट इतर सर्व ठिकाणच्या वकिलास कळण्याकरितां हायकोडतानें आपल्या वरील ठरावाच्या प्रती प्रत्येक जिल्हा कोडताकडे पाठवून सर्वांस सावध केलें आहे.— मुंबई इलाख्यांत असा प्रकार चालतो हे आजपर्यंत आह्मांस माहित नव्हतें. हा प्रकार फार वाईट आहे हें अगदीं उघड आहे. कारण यापासून तंटे वाढण्याचा व त्याच्या योगानें देश भिकारी होण्याचा विशेष संभव आहे. आतां आह्मी अशी आशा करतो कीं, त्या इलाख्यांतील सर्व ठिकाणचे वकील त्या गोष्टीपासून चांगला उपदेश घेतील व इतर इलाख्यापेक्षां मुंबई इलाख्यांतील वकील चांगले आहेत अशी जी ख्याती झालेली आहे तिला काळिमा न आणतां वृद्धी करतील.

ठाणें—या आठवड्यांत पाऊस सरासरी पडत आहे. परंतु या संधीस अवश्य तसा नसल्यामुळें चिन्ह चांगलें दिसत नाहीं. अ. द.

---

## मनुष्याचीं या जगांतील कर्तव्य कर्मे

(मागील अंकावरून पुढें चालू)

बायको—आपण थोडे वयस्कर व स्वतः सिद्ध झालों ह्मणजे स्त्रीसुखाच्या मार्गास लागतों. ती स्त्री जरी दुसरे घरीं जन्म पावली व कित्येक वर्षें पर्यंत तेथें वाढली तरी प्रौढपणीं ती आईबाप व बहीणभाऊ यांसर्वांपेक्षां फार जवळ त्याची होते. तिचा सर्व भरवसा आपल्यावर असतो. तिचे आईबापानीं आपल्यावर तिचें सर्व जीवित सोपविलेलें असतें व त्यावरून ती आपल्या सुखदुःखाची अर्धी वांटेकरीण होते. ह्मणून तिला आपण मनापासून सुख द्यावें, चांगलें शिक्षण द्यावें, तिला मार्गास लावावें, व तिचें आपलें प्रेम जेणेंकरून दृढ होईल तेच उपाय आपण हमेशा योजित असावें हे आपलें कर्तव्य कर्म आहे. कित्येक स्त्रीपुरुषांचे प्रेम नसतें, भूक लागली ह्मणजे जसें जेवण घरांत जावें तसें कामापुरते बायकोकडे जावें, त्याशिवाय तिचें तोंड पाहूं नये. असे कित्येक असतात व कित्येक आपल्या बायकोला गुराप्रमाणें मारितात. पण गरीब, अनाथ व सर्वोपरी आपणावर अवलंबून असणाऱ्या आपल्या गृहस्वामिणीवर असा कठोरपणा मनुष्याच्यानें कसा करवतो तें समजत नाहीं. बायको स्वभावानें वाईट असेल तर तिचा तो स्वभाव घालविण्याविषयीं ती आपल्या संगतीस आल्यापासून उपाय योजिले पाहिजेत. ते उपाय सौम्य पाहिजेत नवऱ्यानें व घरच्या वडील मनुष्यांनीं ती मुलगी लहान पणींच आपले घरीं आल्यापासून तिला काळजीपुरःसर सुशिक्षा व सुसंगती लाविली असतां ती बिघडण्याचा फारसा धाक नाहीं. मनुष्य जें बिघडतें तें लहानपणापासून कुशिक्षेनें, कुसंगतीनें, व स्वैर वागण्यानें बिघडतें ह्मणून आपण जर आपले कुटुंबाविषयीं योग्य काळजी घेऊ तर तें सर्व गोष्टींत आपणास सुख देणारेच निपजेल यांत संशय नाहीं. कोठें कोठें असेंही पाहण्यांत येते कीं बायको मोठ्या कजाग, कृत्या, व नवऱ्याला टांचेंत ठेवण्या जोग्या असतात व त्याप्रमाणें त्या त्यांनां ठेवितात व ते त्याप्रमाणें राहतात. हें कसें घडत? असेल तें असो पण यांत नवऱ्यावर निर्माल्यत्वाचा दोष येतो. तो तशा वृत्तीनें राहण्यांत काय हित पाहात असेल तें असो. स्त्री अनावर किंवा नवरा निर्बल असे त्यांत कांहीं असल्यास नवऱ्याचें तशा प्रकारचें वर्तन दुसऱ्या त्रासकारक उपद्व्यापापासून त्यास बचावणारें असतें ह्मणून तो एक त्याचा गुणच समजावयाचा. असतु.

मुलें—ईश्वरकृपेनें आपणास मुलें झालीं असतां त्यांचें उत्तम प्रकारें लालन पालन करणें व त्यास सुशिक्षा देणें हे आपलें कर्तव्यकर्म आहे
योग्य प्रकारचे हट्ट
त्यांचे मर्यादे नाहे
तसे करूं नें मुलें
लावर येण्यास पुढें फा
त याजकरितां लहानपण
फार पैरवी ठेविली पाहिजे
निपजलीं असतां त्यांपासून
मान होतें येवढेंच नाहीं.
बाल्याहीं वट्टा लागतो सबब
पण्याचें व सुशिक्षण देण्याचे
र मालधागिरी ठेवावी. त्यांचीं
योग्य वयांत व तीं योग्य समजू
ल्यावर करावीं. सांपरे चांगले
कर्जदार पडावे. लग्नकार्यांत
चें व इतर प्रकारचा उधळे
न पुढील संततीला कर्जाचा
रून ठेवूं नये हें आपलें
आहे.

आपले शेजारी पाजारी गरीब
त असले तर त्यांचा यथाशक्ति
समाचार घ्यावा त्यांच्या गरजा
त, त्यांशीं भांडूं नये, मयतें
व प्रसंगवशात ते आपल्या उ
डतील अशा रीतीनें [illegible]
डून ठेवावें हें आपलें कर्तव्य क
याचप्रमाणें गावांतील [illegible]
गळे, लुळे, थोटे, यांस [illegible]
मनर दया करावी दारीं आले
त्यांनां गांजूं नये, त्यांवर कास्ता
नयेत, आपणाजवळ त्यांनां
कांहीं नसलें तर ममतेच्या शब्द
त्यांस परतवावें.

याचप्रमाणें जगांतील सर्व
वासींही आपलें कर्तव्यकर्म हें
त्यांच्या सुधारणेसाठीं आपण
आपल्या विद्येनें, अक्कलनें व
लोकसमुदायाला जी मदत
गी आहे ती सर्वकाल आपण
करित जावी. उदाहरणार्थ जीं येक
धरा रुपयांचा कारकून आहे तर मा
१०० कोसांवरील खानदेशांतल
पडल्यानें पीडिलेल्या लोकांनां का
त होणार आहे? अशी शंका का
हीं न देतां आपण राहूं नये. का
सें प्रत्येकानें येकेक व दोन दोन
केले तर दहा पंधरा हजार रुपये
एका मोठ्या देशाला अर्धी मुधीं
झाली. असाच प्रकार सर्व कामांत
वा. आपण विद्वान व ज्ञानी आहों त
स्तकांतून व वर्तमानपत्रांतून, वगैरे
चा लाभ इतर जनास द्यावा. आप
ठे कामदार असलो तर लांच घेऊ
बिगार घेऊं नये, कोणाचें नाहक
हीं घेऊं नये, प्रजेवर जुलूम होत
त्याची दाद लावावी, व लोकांनां
ल तितकें सौख्य द्यावें हें आपलें
व्यकर्म आहे

याप्रमाणें लोकसं
मांविषयीं थोडें सांगि
राविषयीं कर्तव्यकर्म
(पुढें चालू)

---

हे पत्र अकोला एथें लंडे
फडके यांचे वऱ्हाडस[illegible]र छा